
..ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. २२५१२

# कालचक्र

जयवंत दळवी



IRBK-0122712

वाचनालय नाटक

२२७९२
७।५।८८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २२७९२ नों. दि. ७.५.८८
वि. नाटक क्र. ..................

25

# कालचक्र

दोन अंकी कौटुंबिक नाटक

श्री. जयवन्त दळवी

मॅजेस्टिक प्रकाशन

IRBK-0122712

पहिली आवृत्ती : एप्रिल, १९८८

© सौ. उमा दळवी

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेम्बर्स,
मुंबई–४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

किंमत : २० रुपये

या नाटकाचा पहिला प्रयोग श्री सातेरी प्रॉडक्शन, मुंबई या संस्थेतर्फे विजयादशमीला, शुक्रवारी, २ ऑक्टोबर, १९८७ रोजी रात्री ९ वाजता शिवाजी मंदिर, दादर, मुंबई येथे सादर करण्यात आला.

प्रकाशयोजना : दिग्दर्शन । नेपथ्य । : दामू केंकरे
निर्माता : शशी आरोंदेकर
ध्वनिसंयोजन : राजा देसाई

बाबा : यशवंत दत्त
बाबूराव : दामू केंकरे
राघव : उपेन्द्र दाते
शरद : निरंजन परळकर
आई : सुधा करमरकर
विश्वनाथ : श्याम पोंक्षे
इरावती : राधिका राव
लीला : कीर्ती शरद

या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी लिहा :
सौ. उमा जयवंत दळवी । १३, विकास । भवानी शंकर रोड । मुंबई, ४०००२८

म. [illegible] ग्रंथ, वाचनालय शाखा.
दा. क्र. .............. नों. दि ..............
क्र. ..............
दि. ..............

# अंक पहिला

म. प्र. स. ठाणे, वाचनालय शा.
क्र. 22092 दि 21.५.८८
वि. ३१२६

## प्रवेश पहिला

[ मध्यमवर्गीय वस्तीतला एक ब्लॉक. तीन खोल्यांचा असावा. मध्यम परिस्थितीतला. येथे इनामदार कुटुंब राहते. आई–वडील, मुलगा–सून. पडदा वर जातो, तेव्हा डावीकडे हॉलचा थोडा तिरका भाग दिसतो आणि समोर मोठ्या गॅलरीची केलेली खोली दिसते. हॉलच्या पलीकडे एक छोटी, आखूड गॅलरी आहे. ती दिसत नाही, पण तिथे बॉबी कुत्र्याला बांधलेले आहे. तो दिसत नसला, तरी मधून मधून भुंकतो, गुरगुरतो. प्रेमाचे आवाज काढतो. तिथेच हॉलला एक विनगजांची खिडकी आहे. त्या खिडकीत उभे राहणाऱ्यांना कुत्रा दिसू शकतो. तसेच त्या कुत्र्याला गोंजारण्यासाठी आत कोणी गेला, तर तो त्याला खिडकीतून दिसतो.

हॉल मोठा दिमाखदार नसला, तरी व्यवस्थित आहे. तो काहीसा तिरका दिसत असल्यामुळे हॉलमधल्या सगळ्याच गोष्टी दिसतील, असे नाही. कोपऱ्यात फोन आहे. प्रेक्षकांना स्क्रीन दिसणार नाही, अशा पद्धतीने टीव्ही ठेवलेला आहे. बसण्यासाठी सोफा, खुर्च्या, दोन मोढे वगैरे आहेत.

गॅलरीची जी बंदिस्त खोली केली आहे, ती मात्र ओंगळ आहे. या आखूड खोलीत म्हाताऱ्या आईवडिलांचे वास्तव्य आहे. तिथे दांडी-वरून कपडे लोंबत आहेत. खुंटीवर दोन जुनाट कोट आहेत. त्या कोटांच्या खिशांत बाबा इनामदार काही काही ठेवत असतात. ठेवलेल्या

वस्तूतून वारंवार काहीतरी शोधत असतात. कधी कधी खरोखरच काहीतरी शोधण्यासाठी, तर कधी कधी उगाच वेळ घालवण्यासाठी! कधी कधी कोटाच्या खिशातून एकदम उंदराचे पिल्लू उडी घेते, आणि गडबड उडते. खिशांत लॉटरीची जुनी तिकिटेही साठवून ठेवलेली असतात.

या खोलीत समोरासमोर ठेवलेले बाकडेवजा दोन दिवाण आहेत. त्यांवर जुनाट गाद्या आणि मळलेल्या, डाग पडलेल्या चादरी. दिवाणाखाली आई–बाबांच्या पत्र्याच्या दोन बॅगा आहेत. आईच्या दिवाणाखाली जी बॅग आहे, त्यात तिची लुगडी आहेत. बाबांच्या दिवाणाखाली त्यांची जुनी पत्र्याची ट्रंक आहे. त्यावर त्यांच्या वडिलांचे–' विश्वनाथ (दाजी) विठ्ठल इनामदार, पाडलोस ' असे नाव रंगवलेले आहे. त्या ट्रंकेत त्यांच्या काही जुन्या गोष्टी–कागदपत्रे, डायऱ्या आहेत. समोर दर्शनी भिंतीवर एक जुनाट घड्याळ आहे. शक्य तो हे घड्याळ साखळी ओढण्याचे, दोन्ही बाजूस मुठी लोंबणारे असावे. किंवा जुनाट नक्षीची केस असलेले लंबकाचे. ते घड्याळ सदैव बंद असते; पण ते त्यांच्या पाडलोसच्या घरातले वडिलोपार्जित घड्याळ आहे.

त्यांचा थोरला मुलगा विश्वनाथ. थोरली सून लीला. मुलगा आणि सून– विशेषतः सून घरी नसते, तेव्हा बाबा आणि आई हॉलमध्ये बसतात. अनेकदा टीव्हीवरचे कार्यक्रम बघण्यासाठी! बाबांचे वय पंचाहत्तर. आईचे सत्तर. बाबांना मधुमेह असला, तरी त्यांची तब्येत वयोमानानुसार बरी आहे. ताठ आहेत. चालण्यात थोडा मंदपणा असला, तरी आवाज खणखणीत आहे. तेच तेच परत परत बोलण्याची म्हातारपणची खोड आहे. शिवाय हल्ली स्मृतीतले दुवे तुटू लागले आहेत. पूर्वी त्यांचे घड्याळांचे छोटे दुकान होते. आता ते थोडेसे वाढवून विश्वनाथ (विशा) चालवतो.

आईची प्रकृती बरीचशी ढासळलेली आहे. ब्लडप्रेशर, संधिवात आणि घरचे तणाव यांमुळे ती खंगलेली आहे. विशेषतः, मनाने! सदैव भ्यालेली, भेदरलेली दिसते. भीती सुनेची आणि भविष्याची! भविष्यात काय वाढून ठेवलं आहे, याची!

पडदा वर जातो. संध्याकाळची वेळ आहे. लोलीत संधिप्रकाश. हॉलमध्ये एक मंद दिवा. टीव्हीसमोर एका छोट्या बैठकीवर आई बसली आहे. एक पाय वर घेऊन. टीव्ही बंदच आहे. तरीही ती टीव्हीकडे ताठ डोळयांनी बघते आहे. बहुधा लक्ष नसल्यामुळे किंवा आपल्याच विचारात बुडून गेल्यामुळे असणार !

तेवढ्यात दरवाज्याची वेल वाजते. एकदम कुत्रा भुंकू लागतो. आई कष्टाने पाय सोडवीत आणि करवादून उठते. दरवाजा उघडते. बाबा आत येतात. जुनाट ढगळ पॅंट. पायांशी घडी असलेली—जुन्या पद्धतीची. जुना ऐसपैस शर्ट. पूर्वी ते बरेच जाडे होते. त्या मापाचा शर्टच त्यांनी घातला आहे. खांदे उतरले आहेत. शर्ट पँटीत खारून कमरेला पट्टा आवळला आहे. त्यामुळे पँटीचे कमरेशी पोते झाले आहे. मनगटाकडे बटणे नसल्यामुळे हातांच्या बाह्या लोंबत आहेत. पँटीचे दोन्ही खिसे फुगलेले आहेत. कारण त्यांनी खिशांत बटाटावड्याच्या पुड्या कोंबल्या आहेत. डावा हात आडवा. त्यावर काठी लोंबते आहे. तोंडावर एक-दोन दिवसाची पांढुरकी दाढी—सफेत वाळू चिकटल्यासारखी ! ते आत येऊन काठी ठेवीपर्यन्त आई टीव्हीसमोर येऊन बसते. आणि टीव्हीकडे बघत राहते. तेवढ्यात फोन वाजतो. पण बाबांचे लक्ष नाही. बटाटा-वड्याच्या दोन पुड्या खिडकीत ठेवतात. हातातली औषधांची पुडी कुठे ठेवावी, या विचारात—]

आई : फोन वाजतोय्——

बाबा : (एकदम लक्षात येऊन) हो हो...(गडबडीने हातातली औषधांची चपटी पुडी टीव्हीवर ठेवतात आणि फोन उचलतात. फोन कानाला लावून 'हॅलो' म्हणतात—तोच कानावर दणका बसल्यासारखा फोनमधून आवाज येतो. पलिकडचा माणूस रागारागाने ओरडतो आहे. ते एकदम फोन बाजूला करीत—) हॅलो...हॅलो...तुम्ही फोन खाली ठेवून का नाही ओरडत ? ते मला चांगलं ऐकू येईल...काय ? येस्....येस्....मी वि. वि. इनामदार....काय ? सहा घड्याळं घेतली, त्यांच्या चाव्या दिल्या नाहीत ? (चमकून) वॉचीस् ? वॉचीसच्या चाव्या, की क्लॉकच्या चाव्या ? थांबा...थांबा...वॉच म्हणजे रिस्टवॉच... क्लॉक म्हणजे वॉलक्लॉक—भिंतीवरचं...हां क्लॉकच्या चाव्या.. नाही... नाही....तो माझा मुलगा—तोही व्ही...व्ही...मी विठ्ठल विश्वनाथ...तो विश्वनाथ विठ्ठल...मी सांगतो त्याला....ही नवीन पिढी म्हणजे...तुमचं नाव

काय ? चायंगणकर ? म्हणजे आमच्या बाजूचेच ... तुमचे मालवणी हेल ऐकून वाटलंच मला...(हसतात) मी तिकडचाच...पाडलोसचा. आमचं मूळचं नाव पाडलोसकर.. पण एकोणिसशे चौदा मध्ये ब्रिटिश सरकारनं माझ्या वडिलांना... म्हणजे विश्वनाथ दाजींना इनाम दिलं होतं....म्हणून आम्ही इनामदार.... तुम्ही कधी पाडलोसला गेलात...हॅलो...हॅलो...ठेवला फोन...(फोन ठेवतात. चिडून ) या मालवणी माणसांना मॅनर्स नाहीत ! आणि त्यांना कुणाचं बरं ऐकवत नाही ! आम्हांला इनाम मिळालं, म्हणताच फोन खाली ठेवला !

आई : ( शान्तपणे...टीव्हीकडे बघत–) आपण प्रमाणाबाहेर बोलूच नये !

बाबा : ते खरं ! आमच्याकडे कोकणात गजालीन् घो खाल्लो, म्हणतात ना—

आई : तुम्ही आता असे उभे का ?

बाबा : ( गोंधळून ) मीही तोच विचार करतोय्...मी असा उभा का ?

आई : मग बसा–( बंद टीव्हीकडे बघतच बोलते आहे. )

बाबा : तू बसून काय करते आहेस ?

आई : मी टीव्ही बघतेय्–( बंद टीव्हीकडे बघत राहते. )

बाबा : ( लक्ष जाताच ) हाचेरी ! बंद टीव्हीच बघते आहेस का ?

आई : मी नाही तिच्या टीव्हीला हात लावीत—

बाबा : लाव...लाव...आज ' सुंदर माझं घर ' असणार ! ( कडवट हसत– ) हल्ली ' सुंदर माझं घर ' टीव्हीवरच !...मी लावू का टीव्ही ?

आई : काही नको ! मागनं ती घालून पाडून बोलणी नकोत !...मागं एकदा आवाज गेला–

बाबा : ( लक्ष नाही– ) कुणाचा ?

आई : ( एकदम चिडून ) कुणाचा काय ? टीव्हीचा ! तर म्हणाली, जी–ती माणसं बटणं दाबतात....आवाज जाणार, नाहीतर काय ?....जी–ती माणसं...म्हणजे मी आणि तुम्ही.

[ ते विचारात गढून तिच्याकडे बघत राहतात. ]

बाबा : ( आठवण्याचा प्रयत्न करीत ) मी काही तरी विसरलोय्....

आई : काय ?

बाबा : ( एकदम आठवून ) हो ! मी मंजुनाथकडनं वडे आणलेत, तेच विसरलो– गरमागरम–( ते सहजपणे पॅंटीचे खिसे दाबून पाहतात. पुड्या सापडतात. )

आई : ( करवादून ) कशाला ते तेलकट बटाटेवडे खाता ? आधीच डायबेटीस आहे. रात्री पोट दुखतं, म्हणून ओरडणार–

बाबा : ( एक पुडी उघडून ) उद्या आपण मेलो, तर वडा खायचा होता, ही इच्छा राहायला नको !

आई : 'उद्या आपण मेलो .. उद्या आपण मेलो ' हे गेली कित्येक वर्षं आपण म्हणतोय् ....

बाबा : ( किंचित हसत ) आणि खातोय् ! ( एक वडा पुढे करीत ) खा –

आई : मला नको ! आधीच माझी साखर वाढलीय्– ( वड्याकडे बघत आवंढा गिळतेय् )

बाबा : ( हळूच ) लीला आली ?

आई : नाही !

बाबा : ( वडा खात ) वा : ! झगझगीत . . आलं . . लसूण . . मिरची . .

आई : ( लाळ गिळत ) मंजूकडे केवढी गर्दी असते वडे खायला, नाही ?

बाबा : खाणार ?

आई : ( आवंढा गिळत ) एवढासा तुकडा द्या– ( ते आपण खाल्लेला अर्धा तुकडा देऊ लागतात ) एवढासा तुकडा म्हटलं, म्हणून एवढासाच तुकडा द्यायला नको–

बाबा : ( अख्खा वडा देत ) खा तू –

[ तेवढ्यात गॅलरीतला कुत्रा भुंकतो. साखळीला हिसके दिल्याचा आवाज ऐकू येतो. ]

आई : त्याला वास आला ! .. त्याच्या पुढ्यात टाका अर्धा –

बाबा : मुळीच टाकणार नाही –

आई : तो लीलाचा, म्हणून दुष्टावा करू नका ! मुकं जनावर ते . . त्याच्यामुळे जाग आहे घरात –

बाबा : ( चिडून ) जाग ! त्याचा गोणपाट झाडायला मला सांगते –

आई : थोडी घरातली कामं केली, म्हणून काही बिघडत नाही– ( आपला अर्धा वडा देत ) हा तुकडा टाका त्याला –

बाबा : तू खा ! ( आपला अर्धा वडा खिडकीतून गॅलरीत टाकतात )

आई : चटणी आहे ?

बाबा : मंजू चटणी कुठं देतो ? तळलेल्या मिरच्या देतो . . खाणार ?

आई : मिरच्या ? ( हाताने नको नको म्हणते )

बाबा : ( खिडकीकडे जात ) ह्याला मिरच्या घालतो ! खा ! ... ( टाकतात ) भगभगू दे उद्या–

आई : गेल्या आठवड्यात तुमची पँट मी धुतली, तर दोन्ही खिशांत ह्या एवढ्या मिरच्या—

बाबा : वडे नव्हते ना? ( दुसरी पुडी काढून ) आणखी हवा ?

आई : मला नको!... लीला यायच्या आधी खा! नाहीतर ती डाएटिंग... डाएटिंग ... डाएटिंग करीत बसणार !

बाबा : ते टिंग... टिंग तिचं आमच्यासाठी ! .... ती वरी सगळं खाते !

आई : ते दोन्ही खाऊ नका .... एक विशाला ठेवा—

बाबा : का ? विशा आणतो का, तो बाहेर काय खातो, ते ?

आई : विशा आणील माझा ! पण हिनं मुठीत धरलाय् , म्हणून भितो— ( किंचित अवघडून ) तुमच्यांतला अर्धा द्या— ( ते देऊ लागतात ) नको... नको... बरं नाही ते— विशाला मात्र एक ठेवा—

बाबा : लीला यायच्या आधी आला, तर !

आई : नंतर आला, तर आपल्या खोलीत बोलावून द्या— ( ते वडा खात असताना... बघत... ) तो इच्छामरणाचा कायदा आला का ?

बाबा : ( तल्लीन होऊन वडा खात ) नाही अजून ! का ?

आई : मरता तरी आलं असतं....

बाबा : ( खाता खाता ) मरणाऱ्याला शंभर वाटा आहेत ... आमच्या दाजींनी नाही विहिरीत उडी घेतली ? ( ती वळून :बाजूच्या उघड्या खिडकीकडे पाहत ) तू खिडकीतून मात्र उडी घेऊ नकोस... पहिलाच मजला आहे... नुसतीच मोडून पडशील ....

आई : ( स्वतःशीच ) उडी घ्यायला त्राण आहे कुठं ? .... तुम्ही माझं औषध आणलंत ?

बाबा : ( एकदम गडबडून खिसे चाचपू लागतात ) अरे बाप रे... !

आई : काय झालं ?

बाबा : तुझी गोळ्यांची पाकिटं मंजूच्या गाडीवर राहिली, की काय ? ( खिशांत शोधतात )

आई : ( वैतागून ) तुमचा भ्रमिष्टपणा हल्ली हल्ली वाढत चाललाय्—

बाबा : जाऊन बघू का ?

आई : आता कुठं जाणार ? काळोख पडलाय्...नशिबात असल्या, तर उद्या मिळतील. विशालाही सांगितल्यात मी.... तो आणील...

बाबा : तरी बरं, मी जुन्याच गोळ्यांची तीन पाकिटं घेतली— दोन दोन रुपयेवाली —

आई : त्या गोळ्या नाही आता लागू पडत ! बीपी एकदम वाढतं—

बाबा : डॉक्टरांनी नवीन लिहून दिलंय् ते... एका पाकिटाला अठरा रुपये ! दहा

गोळ्यांना अठरा रुपये! म्हणजे एक रुपया ऐंशी पैसे गोळी... दिवसाला तीन गोळ्या... म्हणजे दिवसाला पाच रुपये चाळीस पैसे... म्हणजे महिन्याला—

आई : मध्ये मध्ये गोळ्या घ्यायला विसरते मी—

बाबा : म्हणून काय झालं ? ( क्षणभराने ) डॉक्टरांना काय, त्यांना औषधांची नावं माहीत असतात ... किंमती माहीत नसतात! माझ्याकडे तेवढे पैसेही नव्हते—

आई : असू दे! विशा आणील—

[ एक शिल्लक उरलेल्या वड्याची पुडी या हातातून त्या हातात फिरवीत ते बावळटपणे खिशात काहीतरी शोधत राहतात. तेवढ्यात शर्टाच्या खिशात त्यांना कागदाचा एक चिटोरा सापडतो. तो कागद डोळ्याला लावून ते वाचायचा प्रयत्न करतात. ]

आई : काय ते ? चश्मा तरी लावा—

बाबा : ( चश्मा लावीत वाचतात ) करोल बाग... न्यू दिल्ली....

आई : तिथं कोण ?

बाबा : शरदिनी फातर्फेकर.... ( ती बघत राहते ) तुला मी कधी बोललो होतो का ?

आई : काय ?

बाबा : चिकित्सक शाळेत एक शरदिनी फातर्फेकर माझ्या वर्गात होती... हुशार मुलगी...फ्रेंच घेतलं होतं...पुढं शिकून ती फॉरेन सर्व्हिसमध्ये गेली होती... पंधरा–वीस वर्षांपूर्वी... ( आठवत ) छे! तीस वर्षांपूर्वी.... ( आठवत ) नाही... पस्तीस... चाळीस...

आई : ( वैतागून ) पन्नास वर्षांपूर्वी समजा ! पण काय ?

बाबा : तिनं आपलं कवितांचं पुस्तक मला पाठवलं होतं... ‘ शरदिनी ’ नावाचं—

आई : आता भेटली होती ?

बाबा : तिचा भाऊ भेटला होता.... मंजूच्या गाडीसमोर रस्त्यावर वडे खात उभा होता. माझ्याकडे बघत राहिला...म्हणाला, प्रि-इंडिपेंडन्स काळात तुम्ही सेक्रेटेरीएट-मध्ये येत होता का ? सेक्रेटरीएटमधली घड्याळं रिपेअर करायला ? मी म्हटलं, हो ! माझं कॉण्ट्रॅक्ट होतं ना– छत्तीस सालापासून.... त्यानं मला इतक्या वर्षांनी ओळखलं, म्हणजे...मी म्हटलं, तुम्ही कोण ? .... म्हणाला, फातर्फेकर... म्हटलं, ‘ चिकित्सक ’मध्ये माझ्या वर्गात शरदिनी फातर्फेकर होती ! ती त्याची थोरली बहीण... आता दिल्लीला एकटीच राहते... करोल बाग....

आई : ( बघत ) जाताय् ?
बाबा : ( चमकून ) कुठं ?
आई : दिल्लीला ?

[ तेवढ्यात दारावरची बेल वाजते. कुत्रा भुंकतो. बाबा दार उघडायला वळतात. ]

आई : लीला असणार ! ... तोंड पुसा.... ( ते रुमालानं तोंड पुसतात. पुन्हा बेल वाजते. कुत्रा भुंकतो ) आणि दूर उभे राहा.... वड्यांचा वास येईल तिला—

[ ते रुमाल तोंडावर धरून दरवाजा उघडतात. विशा येतो. त्यांचाच थोरला मुलगा. पंचेचाळीस वर्षांचा. थोडासा बावळट, नेभळट. कमी शिकलेला. परिस्थितीने थोडासा अवघडलेला. ]

बाबा : विशा तो....

[ कुत्रा साखळीला हिसके देत मोठ्याने भुंकतो. ]

विशा : बॉबी.... बॉबी ! गप्प ! ( खिडकीकडे जातो ) बॉबी ! आलो... आलो... ( हातातील बॅग ठेवीत ) वडे खाताय् ? ( बाबा चपापतात ) वास आला—
बाबा : ( खिशातली पुडी काढून ) खाणार ? ( त्याने 'नको' म्हणावे, असे वाटते )
विशा : एकच द्या—
बाबा : एकच आहे ! ( देतात )
विशा : ( किंचित हसत ) लीला बाहेर गेलेली दिसतेय्–( आईला ) तू खाल्लास ? ( आपण खाऊ लागतो )
आई : ( हाताने दाखवीत ) एवढासा नखभर तुकडा खाल्ला—
विशा : तुझी साखर वाढलीय्, आई !
आई : ( करवादून ) वाढू दे ! जगून तरी काय करायचंय् ?
विशा : ( खाता खाता ) काहीतरी बडबडू नकोस !
आई : गोळ्या मिळाल्या ?
विशा : लीलाला सांगितल्यात—
बाबा : डॉक्टरांनी नवीन गोळ्या लिहून दिल्यात, त्या अठरा रुपये पाकीट !
आई : स्वस्त म्हणून यांनी जुन्याच गोळ्या आणल्या... तीन पाकिटं.... आणि पुडी मंजूच्या गाडीवर विसरून आले ! सहा रुपये पाण्यात—

बाबा : काही पाण्यात नाहीत ! उद्या घेऊन येतो... मंजू ठेवणार !
आई : शरदला फोन केला होतास ?

[ त्याच्या तोंडात वडा आहे, त्यामुळे तो बोलू शकत नाही. ]

बाबा : (चिडून) कशाला ? हिला शरद, म्हणजे अगदी परमेश्वर ! तो आला, म्हणजे परमेश्वर आला !
आई : कुठं येतोय् ? ती तर नाहीच !
विशा : शरद दिल्लीला गेला होता—
आई : (समाधानाने) फोन आला होता ?
विशा : मी गेलो होतो... ऑफिसमध्ये त्याच्या—
आई : कशाला ?
विशा : त्याच्या ऑफिसला घड्याळं घ्यायची होती—
आई : (ओशाळून हसत) मला वाटलं, आम्हांला कधी नेणार, ते विचारायला.
बाबा : हे हे तू त्याला विचारतेस...तो आलेल्या वेळी—म्हणून तो येत नाही—
आई : धाकटा मुलगा ! विचारलं, म्हणून झालं काय ? .... चार महिन्यांसाठी त्यानं नेलं, तर तेवढीच विशाची आणि लीलाची सुटका नाही का ?
बाबा : तो नेतो ! वाट बघ... ! आपण... बायको.... आणि पोरगी !
आई : बानू बरी आहे ?.... जाते ना शाळेत ?
विशा : हो !
आई : म्हणत काय होता.... शरद, रे ?
विशा : गीतं करतेस का, विचारीत होता—
आई : (खुशीने) कपाळाची गीतं ! बानूच्या पहिल्या वाढदिवसाला केलं, ते शेवटलं !
विशा : (लटक्या रागाने) माझ्या रंग्याच्या वाढदिवसाला नाही केलंस गीत—
आई : (हसत) केलं होतं ! श्रीरंगा तर माझा नातू !.... यांच्या ट्रंकेत असणार ते गीत...(हसत) माझी मेलीची कसली गीतं ? उगाच आपलं 'ट' ला 'प'... टप.... टप....
बाबा : टप टप पाऊस पडतो... डोळ्यांतून !
आई : पडू दे !... त्यानं आठवणीनं एवढं विचारलं, तरी—
विशा : (हसत) खरं सांगायचं, म्हणजे त्यानं हे विचारलंही नाही ! मीच सांगितलं तुला पदराचं.... तुला बरं वाटावं, म्हणून !
आई : न विचारेना !

[ विशा मध्येच टीव्हीकडे जातो आणि त्याला टीव्हीवर पुडी दिसते. ]

विशा : ( पुडी दाखवीत ) हे काय आहे?
बाबा : (आनंदाने) ही पाहा! मला पक्कं आठवत होतं. मी गोळ्यांची पुडी आणलीय्––
आई : तुम्ही फोन घ्यायला गेलात, तेव्हा––
बाबा : तुला फोन आला होता–– गवाणकरांचा––
आई : गवाणकर, की वायंगणकर ?
बाबा : वायंगणकर ––
विशा : त्यांनी सहा घड्याळं नेलीत––
बाबा : त्यांत चाव्या ठेवलेल्या नाहीत––
विशा : हा आमचा धोंडी, म्हणजे... पाडलोसचा, म्हणून ठेवला ––
बाबा : त्याला एकदा इथं पाठवून दे ! चांगला भोसडतो मी ! ... पण तुला, विशा, मी सांगतो, आपण हाताखालच्या माणसांवर विसंबून राहू नये. मी रायकरांकडे दहा वर्षे नोकरी केली.... पॅकिंगपासून रिपेरिंगपर्यंत शिकलो . पण प्रत्येक क्षणाला रायकरांचं माझ्यावर लक्ष असायचं ! तेच मी माझ्या दुकानात केलं––
आई : ( हसत ) झालं यांचं रायकरपुराण सुरू ! ( थांबून ) शरदनं तुझ्याकडनं घड्याळ घेतली ?
विशा : घेईन, म्हणालाय् ! पण आपल्याला कमिशन किती, ते विचारीत होता––
आई : ( आश्चर्याने ) भावाकडून कमिशन ?
बाबा : रायकर कधी कमिशन देत नव्हते. मीही दिलं नाही ! कोणी मोठी ऑर्डर दिली, तर घरी मिठाईची पेटी ! मिठाई....म्हणजे म्हैसूर...पेटी मोठी दिसते–

[ तेवढ्यात विशा गॅलरीत जाऊन कुत्र्याला थोपटतो. कुत्र्याचा गळ्यातून काढलेला प्रेमळ आवाज ऐकू येतो. ]

आई : ( तो तिथे असताना हळूच बाबांना ) टीव्ही लावतोय् का, बघा ! सगळे कार्यक्रम संपले असणार !

[ बाबांचे लक्ष नाही. ते खिशातल्या कागदांच्या चिटोऱ्यातून काही शोधत आहेत. तेवढ्यात विशा गॅलरीतून येतो. ]

आई : आता तुमचं पुन्हा काय हरवलं ?

बाबा : ( शोधत ) एक लाख रुपये कुठं गेले—

विशा : ( चमकून ) एक लाख ?

बाबा : लॉटरीचं तिकीट— ( शोधतात )

आई : कशाला रुपया... रुपया घालवता तो ?

बाबा : काही घालवलेला नाही ! गेल्या आठवड्यात दोन रुपये लागले होते—

आई : खूप झाले !

विशा : ( कोचावर बसत ) त्यापेक्षा पूर्वीपासनं काही सेव्ह केलं असतं—

बाबा : ( काहीसे चिडून ) अरे विशा, नेहमी सेव्ह केलं असतं....सेव्ह केलं असतं, म्हणतोस. मी काय रेसला जात होतो, का जुगार खेळत होतो ?

विशा : पण हातांत पैसे होते, तेव्हा वाटत होता— ज्याला त्याला—

बाबा : ज्याला त्याला, म्हणजे कोणाला ?

विशा : वागळेला नाही दिलेत दहा हजार ?

बाबा : त्याच्या मुलीचं लग्न अडलं होतं, विशा... आणि त्यानं नंतर फेडले—

विशा : फेडले ! चार हजार फेडले !...त्या पांगमला पाच हजार दिलेत— टॅक्सीसाठी. त्यानं काय दिलं ? टॅक्सीतनं सुद्धा कधी तुम्हांला फिरवलं नाही.

आई : अरे, पाडलोसची किती पोरं इथं शिकायला होती—

बाबा : शिकली, म्हणून ना पोटापाण्याला लागली ?

विशा : लागली ! मधू राजाध्यक्ष नोकरी मिळेपर्यंत इथं मुसाला होतो ! पण त्याच्या ऑफिसात घड्याळं हवी होती, तर माझ्याकडनं घेतली नाहीत— मी दिलं असतं कमिशन—

आई : माणसं बदलतात रे, विशा ! हा मधू इतका चांगला होता, इथं होता, तेव्हा ! नोकरी लागली—

विशा : लागली कुठली ? बाबांनी बापू करमरकरांना सांगून—

बाबा : ठीक आहे— आपल्या गावचा, म्हणून केलं !

आई : ( हसत ) नोकरी लागली, की पहिल्या पगारातनं मला लुगडं भेट देणार, म्हणायचा... ( हसत ) म्हणून येत नसणार—

बाबा : (वैतागून) उद्या मी त्याच्याकडे जातो आणि तुझं लुगडं मागून आणतो. ( आई गमतीने हसते )

विशा : ( अजून चिडलेलाच आहे ) इथं राहून सगळे शिकले— मला मात्र मॅट्रिकच्या पुढं शिकता आलं नाही !

बाबा : तुला कोणी ' शिकू नको ' म्हटलं होतं का ?

विशा : ( रागावून ) पण शिकलो का ? तुमच्या घड्याळाच्या दुकानात राबलो आठ— आठ... दहा–दहा तास—

बाबा : अरे, हो ! पण म्हणूनच शरद एमेस्सी होऊ शकला ना ?
विशा : तो शिकला...तो आरामात पाच–सात हजार कमावतोय्–
बाबा : आणि तुला दुकान दिलं, ते ? तुझ्याकडनं काय घेतलं मी ?
विशा : ( वैतागून ) दुकानात होतं काय ?... दुकान दिलं ! घरखर्च भागायची मारामार... रंग्याला पाचगणीला ठेवलाय्...तर बोर्डिंग स्कूलचे पैसे पाठवताना तोंडाला फेस येतो–
आई : हवी कशाला पाचगणी ? आम्ही बघितलं नसतं ? मग असतात कशाला आजा–आजी ?
विशा : तुमच्या कौतुकानं तो बिघडला–
बाबा : काही बिघडलेला नाही ! आमच्यापास्नं तोडायचा, म्हणून तिनं त्याला तिथं धाडलाय्– ( आवाज चढत जातो )
विशा : तुम्ही ना, बाबा, असे तिरसटासारखे बोलता...म्हणून मग ती चिडते–
बाबा : उगाच नाही बोलत ! आम्ही असू म्हातारे आणि निरुपयोगी ! म्हणून आमची इतकी अडगळ ?... मग न्या गच्चीत आणि फेका खाली ! संपवा एकदा कटकट !
विशा : तुमचं आपलं काहीतरीच असतं–
आई : तू, विशा, त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस ! त्यांची ही जन्माचीच खोड आहे–
बाबा : ( चिडून ) अरे, असेल हिचं ( आईचं ) डाएटिंग...म्हणून तिची एवढी उपासमार करायची ? एक फुलका.. आणि एवढीशी उकडलेली भाजी ? भाजी आणायला विसरले, म्हणायचं आणि भाजीऐवजी अर्धी वाटी दही द्यायचं... एवढ्यावर दिवस काढायचा ?.... त्या... त्या बॉबीला घालता, तेवढं तरी आम्हांला घाला !...तुला एक सांगतो, विशा ! ती मरेल ना...तेव्हा डायबेटीस आणि ब्लडप्रेशरनं मेली, असं डॉक्टर सांगतील... कार्डिॲक ॲरेस्ट हा डॉक्टरांचा पेटंट शब्द आहेच... पण ती खरी भुकेनं.... उपासमारीनं मेलेली असेल ! ( ओरडल्यामुळं खोकतात. )
आई : ( अस्वस्थ होत ) मी काही मरत नाही ..आणि मेले, तर त्यात वाईट काही नाही ! तुम्ही आवाज चढवू नका ! आवाज चढला, की माझी कलकलणी सुरू होते !
विशा : आई, तुला खरंच पुरेसं मिळत नाही ? अग, डॉक्टरांनीच मापं सांगितलीत–
आई : ( त्याला गोंजारत ) मला खूप मिळतं, रे ! आहे कुणाला भूक ? लीला खूप करते आमचं !... खरं म्हणजे तू आम्हांला कुठं तरी वृद्धाश्रमात नेऊन टाक !
बाबा : तिथं मोफत ठेवीत नाहीत ! तीन–तीनशे...चार–चारशे रुपये घेतात– महि-

न्याला ! नाहीतर कधीच टाकलं असतं यांनी–

आई : यांनी तरी किती करायचं आमच्यासाठी ? म्हणून म्हणत होते–शरदनं चार महिने नेलं असतं—

विशा : कधी हा विषय काढला, तर ती मीना तिसराच विषय काढते...

आई : तुम्हांलाही तुमचं आयुष्य आहे... तुमच्या हौसा–मौजा आहेत... तुम्ही किती वर्षं आमचं लोढणं ओढायचं ?

विशा : मी लीलाला सांगतो ! पण डॉक्टरांनीही कडक डाएटिंग सांगितलंय्, हे लक्षात ठेवा !

बाबा : डॉक्टरांचं काय जातं ? ते स्वतः खातात आणि दुसऱ्याला डाएटिंग करायला सांगतात–

विशा : तुमची शुगर वाढलीय् !

बाबा : पर्वा नाही ! ज्यांना जगायचं आहे, त्यांना डाएटिंग !...मी डाएटिंग करणार नाही...शंभर वेळा मी तिला सांगितलंय् .. पण ताटात एवढंसं वाढून ताट खोलीत आणून ठेवते...मग मागनं काही नाही–

विशा : ( वैतागून ) पण, बाबा, मागायला काय होतं तोंड उघडून ?...आमची खर्चाची ओढाताण होते, हे खरं ! पण म्हणून भात– आमटी– भाजीची कमतरता नाहीए—

बाबा : पण, विशा, आपल्याला कळतं ना, वाढायची इच्छा आहे, की नाही, ते ?

विशा : ( चिडून ) तुम्ही हे फारच ताणताय्...आणि तुम्ही एक लक्षात ठेवा...तुम्ही माझे आई–वडील आहात....तुम्ही तिचे कोण ?

बाबा : खरं आहे ! ( आई हताशपणे डोक्यावर हात घेते ) खरं आहे ! आम्ही तिचे कोणी नाही !

विशा : तुम्ही तिला लळा लावलात, तर ती तुम्हांला लळा लावील...

बाबा : आमच्या दोघांच्या गळ्यांत पट्टे बांधा आणि गॅलरीत बांधा...म्हणजे कदाचित लळा लागेल...

विशा : ( त्राग्यानं ) हे तुम्ही आज चालवलंय् काय, बाबा ?

बाबा : असू दे !

आई : हे बघ, विशा, तू तिला काही सांगू नकोस....वाकडेपणा तेवढा मनात राहील ! खरंच तुला सांगते...ती आमचं खूप करते !

विशा : एक मी तुम्हांला सांगतो–म्हाताऱ्या आई–बापांना सांभाळणं हे कठीण कर्म आहे ! तरीही मी तुम्हांला सांभाळतो आणि सांभाळणार आहे ! कारण तुम्ही दोघांनी आमच्यासाठी काय काय केलंय् , याची मला जाणीव आहे ! कधीतरी आम्हीही म्हातारे होणार आहोत, याचीही मला कल्पना आहे–

आई : (त्याला गोंजारीत) हे असं बोलले, म्हणून, विशा, तू मनाला लावून घेऊ नकोस! ह्यांची ही सवयच आहे! यांना घरची माणसं नकोत!

बाबा : (त्याला एकदम कुशीत घेत) तुझ्याबद्दल, विशा, आमची तक्रार नाही. काही तरी मनात साठलेलं असतं...ते असं बाहेर पडतं...तुला दुखवायचा माझा हेतू नव्हता!....तुझ्याशिवाय आमचं कुणीही काही करणार नाही. तुझ्या-शिवाय आम्हांला दुसरा आधार नाहीं...

[त्यांचा आवाज एकदम कातर होतो. तिघांचीही मने एकदम गहिवरतात. आई तर बसल्या बसल्या नाक-डोळे पुसू लागते.

काही क्षण भावनाविवश अवस्थेत जातात. त्यातून एक सुटका म्हणून विशा टी. व्ही. लावतो. आईच्या आणि विशाच्या तोंडावर टीव्हीचा प्रकाश लख-लखतो टी.व्ही.वर मुख्य कार्यक्रम सुरू होण्याआधी खाण्यापिण्याच्या जाहि-राती सुरू होतात. बाबा खिडकीतून बाहेर बघत राहतात.]

विशा : बाबा, तुम्ही बघा ना—

बाबा : त्या खाण्यापिण्याच्या जाहिराती संपू देत....आमचं डाएटिंग चालू आहे... उगाच भूक लागायला नको! (आई तोंडावर पदर धरून हसते.)

विशा : (हसतो) या..या! बसा....बसा!

[तेवढ्यात दारावरची बेल वाजते. विशा दार उघडतो. लीला येते. तिने पिशवीभरून भाजी, मासळी वगैरे काही काही आणलेले आहे. तिचा सुगावा लागताच बॉबी भुंकू लागतो. साखळीचे हिसके ऐकू येतात.]

लीला : (कौतुकाने हसत) बॉबी....बॉबी....! (बॉबी भुंकतो) आले, रे.... थांब जरा—

आई : मी घेऊ का? (पिशवी)

लीला : नको—

[विशा तिच्या हातातली पिशवी घेऊन आत जातो.
तिने पंजाबी ड्रेस घातला आहे. तो बघून बाबा आणि आई एकमेकांकडे बघून खुणा करतात. ती गॅलरीत कुत्र्याकडे जाते. कुत्र्याचा आवाज.]

आई : ( हळूच ) ड्रेस बघा ! ओढणी नाही !

विशा : ( बाहेर येत ) काय ?

आई : यांचा कार्यक्रम थोडा...जाहिराती खूप ! तू हल्ली चॉकलेट खाल्लं होतंस का, रे ?

विशा : हवंय् का तुला ?

आई : मला नको, बाबा !

लीला : ( आत येत ) आज तुम्ही लवकर कसे घरी ?

विशा : या बाजूला आलो होतो...परत दुकानात गेलोच नाही !

आई : माझ्या गोळ्या मिळाल्या का ?

लीला : काय ?

विशा : आईच्या गोळ्या आणल्या का ?

लीला : जुन्याच आणल्या ! त्या नवीन गोळ्या मिळतच नाहीत ! पाच–सहा फार्मसीज् फिरून आले—

[ बाबा आणि आई एकमेकांकडे अर्थपूर्ण पाहतात. लीलाच्या लक्षात येते. ]

विशा : हल्ली कुठलं औषध कधी मिळेल आणि कधी नाही–

[ हे संवाद चालू असताना टीव्हीच्या जाहिराती चालू असतात. दोन जाहिरातींच्या मध्ये बरोबर संवाद बसतात. लीला स्वैपाकघरात जाते. तिघे टीव्हीसमोर बसून जाहिराती बघतात. लीला परत बाहेर येते. टी.व्ही. बंद करते. आई आणि बाबा उठून आत जावे, म्हणून त्यांच्याकडे बघत राहते. आई पाय सोडून उठतेच आहे; पण बाबा मात्र दोन्ही हातांची घडी छातीवर घेऊन बघत राहतात. हट्टाने बसून राहतात. ]

विशा : टी. व्ही. त्यांना बघायचा असेल–

लीला : आईच्या डोळ्यांवर परिणाम होतो.... ( आई उठते आहे ) बसून बसून त्यांचे पाय आखडतात. ( आई उठून आत जाऊ लागते. बाबा हट्टाने बसून राहतात. ) बाबासाहेब– उठा !

[ उठण्याची खूण करते. ते उठतात. रागारागाने ताडताड खोलीत जातात. आई रेंगाळत, कशाच्या तरी आधाराने खोलीत जाते. ]

आई : ( जाता जाता लीलाला ) आत काही करायचं आहे ?

लीला : काऽही नको ! तुम्ही विश्रांती घ्या.

[ आई आपल्या खोलीकडे जाऊ लागते. लीला परत टीव्ही लावते. टीव्हीवर गायन. आवाज कमी. तोपर्यंत बाबा आपल्या खोलीत येऊन रागारागाने बोलू लागतात. मनातला राग बाहेर काढायची त्यांची ही एक पद्धत आहे. आरशासमोर उभे राहून रागाने बोलतात. ]

बाबा : ( आरशातल्या प्रतिबिंबाशी ) वा, रे, वा ! बाबासाहेब !... साहेब ! तुमच्या नानाची टांग !

आई : ( पाय ओढत आत येते ) कुणाशी बोलताय् ?

बाबा : बाबासाहेब इनामदारांशी ! पाडलोसचे इनामदार ! बाबासाहेब !

[ ती हसते. पण त्यांचे लक्ष नाही. ]

आई : तिचं काऽही चुकलं नाही !....टीव्ही बघून बघून डोळ्यांवर परिणाम होत असेल....सांधे सुद्धा बसून बसून आखडत असतील–

बाबा : ( चिडून ) तिच्या नानाची टांग ! नाऽऽनाऽऽची टांऽऽग ! ( ती तोंडावर पदर घेऊन हसते. ते भडकतात ) चूऽऽप ! हसू नकोस ! ( आपणच दचकतात आणि हॉलकडे बघतात. विशा आणि लीला टीव्ही बघत आहेत. ) ऐकलंस ना ? ऐकलंस ना तू ? सहा फार्मशा फिरली...पण ते नवीन औषध मिळत नाही ! मी दोन ठिकाणी विचारलं...दोन्ही ठिकाणी होतं...माझ्याकडे फक्त तेवढे पैसे नव्हते ! खोटं बोलायचं, म्हणजे किती ?

आई : असू दे ! हवं कशाला ते नवीन औषध ? तुम्ही चिडू नका–

बाबा : मी चिडलो, की मला भूक लागते.

आई : ( दिवाणावर बसत ) मग चिडावं कशाला ?

बाबा : तू तुझा वडा खाल्लास का ?

आई : कधीच !

बाबा : ( खिसा चाचपीत ) माझ्या या खिशात ठेवलेला वडा कुठं गेला ?

आई : ( हसत ) तुम्ही विशाला दिला ना ?

बाबा : हो...हो ! हल्ली लक्षात नाही राहत...! ( क्षणभर विचार करीत ) काही खायला आहे का ? एकदम भूक लागली...चिडलो ना ? म्हणून !

आई : ग्लूकोजचं बिस्कीट देऊ ?

बाबा : दे !

[ ती उशीखालचा छोटा पुडा देते. त्यातली दोन बिस्किटे काढून खाऊ लागतात. ]

बाबा : ( पुडा परत देत ) तू खा—

आई : छे ! मी जवळ ठेवते, म्हणजे काय, एकदम कलकलणी सुरू झाली, तर तोंडात टाकायला बरं ! .... कुणाला धावाधाव करायला नको ! उद्या बाहेर गेलात, तर आठवणीनं एक पुडा आणा—( बिस्किटाचा पुडा उशीखाली लपवते. थोड्या वेळाने ) शरदनं बोलावलं नाही राहायला, नको बोलावू दे ! पण हाही काही तोंड उघडून म्हणाला नाही.... शरदकडे कशाला जायला पाहिजे, राहा आपल्याकडे, म्हणून—

बाबा : कोण ?

आई : हाच थोरला... तुमचा तासकाटा—

बाबा : ( हसत ) हा तासकाटा... आणि धाकटा मिनिटकाटा... ही त्यांच्या लहानपणी कौतुकानं दिलेली नावं आता आठवतसुद्धा नाहीत ! ( मान हालवीत...स्वतः-लाच सांगितल्याप्रमाणे ) सगळेच काटे शेवटी एका दिशेनं जाणार ! त्यांतल्या त्यात हा तासकाटा उजवा !

आई : उजवा कसला ? पक्का आहे ! .... कधी दहा रुपये देत नाही— हात उचलून—

बाबा : धाकटा तरी काय देतोय् ?

आई : निदान आलेल्या वेळी दहाची नोट तरी हातावर टेकवतो—

बाबा : म्हणून येतो तीन-चार महिन्यांनी ! ... मला एकदा लॉटरीत लाखभर रुपये लागतील ना, तर या सर्वांना नाचवीन एकदा— अस्वलासारखे ! इच्छा आहे मरण्याआधी ! ( थांबून ) हे... हे घड्याळ ! ( भिंतीवरचे जुनाट घड्याळ बघत राहतात ) दुरुस्त करून आण, म्हटलं, तर आणीत नाही—

आई : करायचं काय ते मोडकं घड्याळ ?

बाबा : ( एकदम चिडून ) तुला अक्कल कमी आहे !

आई : तुमच्याशी लग्न केलं, तेव्हाच ते सिद्ध झालं ! ( खु...खु .हसते.)

बाबा : ( चिडून ) हसू नकोस ! साधंसुधं घड्याळ नाही ते ! पाडलोसच्या घरातलं घड्याळ ! अप्पांनी आणलेलं... अप्पा म्हणजे कोण ?

आई : कोण ?

बाबा : ( वेडावून ) कोण ऽ ऽ ! घरची माणसं आठवणार नाहीत तुला ! माहेरची वंशा-वळ घडाघडा वाचून दाखवशील ! अप्पा म्हणजे—

आई : ठाऊक आहे ! दाजींचे वडील !

बाबा : विठ्ठल विश्वनाथ... त्यांचंच नाव मला ठेवलंय्...

आई : तेही घड्याळजी होते ? ( खु...खु हसते. बाबा चिडून बघतात व ती बिस्किटांचा पुडा देत ) चिडलाय् ना ? बिस्किट खा !

बाबा : तुला कळत नाही, रुक्मिणीबाई! माणसं मरतात... जातात! त्यांच्या आठवणी अशा वस्तूंतून शिल्लक उरतात. म्हणून मला हे घड्याळ रिपेअर करून हवंय्! बरं, माझी हत्यारं आण म्हटलं, तर तीही आणत नाही! मी खोलून रिपेर करीन!

आई : दाजींचं पॉकेटवॉच विशाला दिलंत, ते कुठं आहे? सोन्याची चेन होती—

[ बाहेर हॉलमध्ये जाऊ लागतात. ]

बाबा : म्हणूनच त्यानं ते मागून घेतलं! आहे, की विकून खाल्लं, कोण जाणे—

आई : कुठं चाललात?

बाबा : माझी हत्यारं उद्या आणायला सांगतो. मी घड्याळ रिपेर करीन—

आई : ( त्यांना अडवीत ) इथं बसा! खूप झालं तुमचं रिपेरिंग!

बाबा : हात कापतात, म्हणून? तुला काय वाटलं? मी रिपेर करू शकणार नाही? गव्हर्नरच्या बंगल्यावरची सर्व घड्याळं मी रिपेर केलीत! घड्याळ बिघडलं, की गव्हर्नर म्हणायचा, कॉल मिस्टर इनामदार! काय त्याचं नाव?

आई : रॉजर लंबले—

बाबा : राइट! ( चमकून ) तुला काय माहीत?

आई : तेच तेच ऐकतेय् ना मी हयातभर—

बाबा : रॉजर लंबले! भला माणूस! मेला असणार! बागेत फिरत असला, तर हसायचा आणि विचारायचा, हाव हार यू? ... मी म्हणायचो—

आई : ( मान हलवीत ) ओक्के .. ओक्के! ( हसते )

बाबा : ( चिडून ) हेही तू हयातभर ऐकलं असलंस, तरी मी ते परत सांगणार आहे... मी म्हणायचो—

आई : ( मान हलवीत... हसत ) ओक्के... ओक्के!

बाबा : ( चिडून ) ओक्के!

[ आई हसत पुन्हा बिस्किटांचा पुडा पुढे करते. ते 'नको' असे चिडून ओरडतात आणि खोलीतला दिवा लावून आपल्या दिवाणाखालची ट्रंक ओढून त्यात शोधाशोध करतात. येथपर्यंत हॉलमध्ये टीव्ही चालू होता. विशा आणि लीला टीव्ही बघत होती. लीला मधून मधून उठून स्वैपाकघरात जात होती. परत टीव्हीसमोर येत होती. ]

आई : तुम्ही ते जेवणाखाण्याचं विशाकडे बोलायला नको होतं— तो ते तिला

सांगणार—

बाबा : सांगू दे ! मी काही चुकीचं बोललो का ?

आई : अशानं वाकडेपणा वाढतो !

बाबा : वाढू दे !

आई : वाढू दे कसा ? गरजवंत आपण आहोत.

[ ते उत्तर न देता ट्रंकेत काहीतरी शोधत राहतात. तेवढयात लीला हॉलमध्ये टीव्ही बंद करते आणि आत जाऊ लागते. तेवढयात– ]

विशा : मघाशी तू आई–बाबा बसले असताना टीव्ही बंद करायला नको होतास—

लीला : तुम्हांला काय कळतं ? टीव्ही सारखा सारखा डोळ्यांना बरा नाही. ( ती आत जाणार, तेवढयात )

विशा : आणि तिला एखादा फुलका जास्ती वाढत जा—

लीला : सांगत होत्या ?

विशा : सांगत नव्हती....पण ती अशक्त दिसते.

लीला : ती शुगर वाढल्यामुळं ! बाबा वडे आणणार... ( विशा चपापतो ) भजी आणणार... बिस्किटं खाणार... कुणाच्याही जिभेवर कंट्रोल नाही.

विशा : म्हातारी माणसं आहेत झिडकारता येतात का ?

लीला : ( फणकारून ) हे तुम्ही धाकट्या भावाला का नाही सांगत ? मीना यांना काय घालते, बघू या ना ? खायला देणार फरसाण...फरसाणाबरोबर आणलेली फुकटातली चटणी जेवताना !

विशा : तरीसुद्धा शेवटी, लीला, ती आपली माणसं आहेत... करायला हवं.

लीला : हो ! घडयाळांना चावी देण्याइतकं सोपं नाही ते ! आम्हांला आमचं असं काही लाइफच उरलेलं नाही ! यांच्यामुळं कुठं चार दिवस पाचगणीलासुद्धा जात येत नाही— (तडतड आत निघून जाते. पाठोपाठ तोही आत जातो. )

आई : ( हळूच ) दोघांचं काहीतरी कुचुकुचु चाललं होतं...तुम्हांला ऐकू आलं ? ( बाबांचं लक्ष नाही. ते ट्रंकेत काहीतरी शोधण्यात मग्न ) काय एवढं शोधताय् ?

बाबा : ते कवितेचं पुस्तक शोधतोय् शरदिनी फातर्फेकरचं...आहे, की गेलं...देव जाणे !

आई : पण आत्ताच एवढं काय अडलंय् ?

[ तेवढयात लीला खोलीच्या दरवाज्यात येते आणि स्विच ऑफ करून दिवा घालवते. ]

लीला : ( जाता जाता...स्वतःशीच वैतागून ) उगाच वीज जाळायची...( आत जाते. )
आई : ( समजावीत ) असू दे ! ते उद्या बघा आता—
बाबा : ( रागाने उठत ) नाही ! मी आत्ताच बघणार ! ( दिवा लावतात )
आई : पण आपण तरी वीज कशाला जाळा ?
बाबा : ( चिडून ) जाळणार ! जाळणार ! मी माझं दुकान त्याला मोफत दिलंय् ! वीज मोफत जाळत नाही मी—
आई : ( वैतागून ) जाळा ! अशानं फक्त वाकडेपणा वाढतो !
बाबा : वाढू दे !

[ ट्रंकेत शोधता शोधता त्यांना एक लखोटा सापडतो. तो उघडून ते त्यातली चिठ्ठी बघत राहतात. चिठ्ठीला शंभराची नोट लावलेली दिसते. ]

आई : ती दाजींची ना शेवटची चिठ्ठी ?
बाबा : ( चिडून ) का ? का त्यांना असं वाटलं, की त्यांच्या मर्तिकाचा खर्च मी करणार नाही, म्हणून ?....एकुलता एक मुलगा असून ?...आणि शेवटी कोणी केला ? मीच केला ना सगळा खर्च ? होमहवन करून शान्तीसुद्धा केली—
आई : त्यांचे ते शाप तर आता आपल्याला बाधत नसतील ?
बाबा : ( एकदम काहीतरी नवीन ऐकल्यासारखे ) शाप ? कशासाठी ? काय ? काय केलं मी, म्हणून त्यांनी असा दावा धरला ? ( एकदम भावनाविवश होऊन ते गदगदतात. शर्टाच्या बाहीने डोळे पुसतात. )
आई : ( खरचटून ) ऐकलंत ? आता दिवेलागणीला डोळयांतनं पाणी काढू नका ! पन्नास वर्षं उलटून गेली... ती नोट अजून चालत असली, तर शंभर रुपये देऊन टाका कुठल्या तरी संस्थेला— ( ते ती नोट बघत राहतात. ) त्या वेळी जमीन सोडवून घ्यायला दोन हजार रुपये पाठवले असते...
बाबा : ( वैतागून ) हो ! पण होते का माझ्यापाशी ? आणि मी माझं दुकान थाटू, की यांच्या जमिनी सोडवू ?
आई : एवढ्यासाठी त्रागा करून त्यांनी नाव टाकलं तुमचं...आणि तुम्ही त्यांचं....
बाबा : तिथं चुकलो मी ! तरुणपणी हे सुचत नाही ! मी त्यांच्याशी भांडायला नको होतं ! ( पुनः डोळे पुसतात. )
आई : ती ट्रंक बंद करून ठेवा आता—

[ ते लखोटा बंद करून ट्रंकेत ठेवतात. ट्रंक दिवाणाखाली लोटतात. तेवढ्यात कुत्रा भुंकू लागतो. लीला दोन ताटे घेऊन खोलीत येते. ]

आई : (लीलाला) अग, तो बॉबी ओरडतोय्...त्याला घाल आधी–

लीला : (तुटकपणे) तुम्ही जेवा आधी...(ती एक ताट आईला देते. दुसरे बाबांना आणि जाता जाता–आईला) दोन फुलके आहेत.... बघून खा! (जाते)

आई : (बाबांना) ऐकलंत?

बाबा : ऐकलं! मघापासून मासळी तळल्याचा वास सुटलाय्–

आई : असू दे! मला तळलेलं खायचं नाही! तुमच्यांतला मला अर्धा तुकडा द्या.... काय आहे? पापलेट?

बाबा : (ताटात शोधत) माझ्याही ताटात नाहीये... (वाटीत हात घालून) आग लागो या जेवणाला! फ्रीजमधली सकाळची भाजी धड गरम सुद्धा केलेली नाही–

आई : (उठत) ओरडू नका! ती तरी काय काय म्हणून करील? आणा, मी गरम करून आणते–

बाबा : (ताट देत) येताना पापलेटाचे दोन तुकडे आण!...काय मोफत खात नाही! दुकान मोफत दिलंय्–

आई : (जाता जाता) दाजींचाच स्वभाव तुमचा– (जाते.)

[आई स्वैपाकखोलीत जाताच एकदम ताटे पडल्याचा आणि व लीला व विशा यांनी ओरडून गलका केल्याचा आवाज ऐकू येतो. तो ऐकून बाबा घाईघाईने स्वैपाकघरात जाऊ लागतात. तेवढ्यात विशा आणि लीला आईला उचलून आणताना दिसतात.]

विशा : (वैतागून) पडली अडखळून! नको तिथं कडमडायचं कशाला?

लीला : काय हवं, ते मला नाही का सांगायचं? आपण कशाला यायला हवं स्वैपाकघरात?

[तिघेही तिला परत उचलू लागतात. तो काळोख.]

## प्रवेश दुसरा

[तेच स्थळ. पंधरा दिवसांनंतर. सकाळी दहा वाजता. रविवारचा दिवस. विशा हॉलमध्ये पेपर वाचत बसला आहे. तेवढ्यात दारावरची

बेल वाजते. कुत्रा भुंकतो. विशा दरवाजा उघडतो. शरद आत येतो. वयाने पस्तिशी उलटलेला ]

विशा : अँब्युलन्स आली ?
शरद : ( घड्याळ बघत ) तासाभरानं येईल. तू सांगितलंस बाबांना ?
विशा : नाही ! मला धीरच झाला नाही !

[ तेवढ्यात प्लॅस्टरमधला पाय कसाबसा टेकत लीलाच्या आधाराने आई आतून स्वैपाकखोलीतून हॉलमध्ये येते ]

आई : ( दुरून ) कोण, रे, विशा ? शरद आलाय् ?
विशा : हो !
आई : ( दुरून ) आवाजावरनं ओळखलंच मी–
शरद : ( आत येत ) आई, काय म्हणते ?
आई : काय म्हणणार ?... एकटाच आलास ? ( आपल्या छोट्या खोलीत येता येता ! )
शरद : मीना दिल्लीला गेलीय्...
आई : कशाला ?
शरद : तिची सोशल वर्कर्स कॉन्फरन्स आहे–
आई : बानू एकटीच घरी आहे ?
शरद : ती त्या आजीकडे राहायला गेलीय्– ( आई नुसती मान हलवते. ही आजी अस्तित्वात नाही, या अर्थी ) तुझं दुखणं काय म्हणतं ?
आई : ( कंटाळून ) माझं दुखणं काय म्हणणार ? मी जगतेय्, हेच माझं मोठं दुखणं !
शरद : जग, ग, तू भरपूर. आनंदानं जगावं ! पायाचं प्लॅस्टर काढलं, की घरातल्या घरात....( लीला आईला दिवाणावर बसवते आणि जाऊ लागते. )
आई : ( हसत ) कुठल्या घरात ? ( लीला अर्थपूर्ण हसते आणि आत जाते )
शरद : ( चपापतो ) ते बघू– ( खिशातून दहाची नोट काढून देतो )
आई : कशाला देतोस तू आलेल्या वेळी ?
शरद : ठेव हातखर्चाला ! बाबा कुठं गेले ?
आई : आंघोळीला ! आज रविवार ! धोबीघाट घातला असेल–उगाच आपलं काही तरी धूत असतात–
शरद : एकदा ते कोट धुवा, म्हणावं–
आई : कोट ? ( कपाळाला हात लावीत ) काय काय असतं त्या कोटात– ( शरद

एका कोटात हात घालतो. आणि एकदम ओरडून उडतो. उंदराच्या पिल्लाने उडी मारलेली असते.)

शरद : (हसत) उंदराचं पिल्लू...

आई : (हसत) दुसऱ्या खिशात मांजराचं सुद्धा पिल्लू सापडेल. (हसते.)

शरद : (कोटाचे खिसे धुंडाळतो. एका खिशातून लॉटरीच्या तिकिटांचा गठ्ठा दाखवीत) पाहिलंस?

आई : काय ते?

शरद : लॉटरीची तिकिटं—(परत खिशात ठेवतो)

आई : जुनी ती! उगाच आपली घेत असतात. लागतात दोन रुपये, चार रुपये—

शरद : (मागे येत) यासाठी यांना पैसे हवे असतात—

आई : (दचकून) तुझ्याकडे मागितले?

[तेवढ्यात बाबा आंघोळीहून येतात.]

बाबा : तू कधी आलास?

शरद : आत्ताच आलो!...

बाबा : (आईला) आज अंगाला लावायचा साबण नव्हता—

आई : का?

बाबा : लपवून ठेवला! कपड्याच्या साबणानं आंघोळ केली—(शरद कुत्सित हसतो)

आई : (हसत) कपड्यासकट करायची आंघोळ—

बाबा : म्हणजे काय होईल?

आई : आंघोळीबरोबर आपोआप कपडेही साफ! (सर्व हसतात)

[स्वैपाकघरातून लीला येते. येता येता शरदकडे बघते. शरदची पाठ आहे. ती विशाकडे जाऊन 'स्वारी मुसाला—जेवायला—आलीय्' अशा अर्थी खवचट अभिनय करते आणि खोलीत येते.]

लीला : मीना दिल्लीला किती दिवस राहणार?

शरद : बघायचं! आठवडाभर तर नक्कीच—

बाबा : (दचकून) दिल्लीला? अरे, मला तरी सांगायचंस—

शरद : का?

बाबा : करोल बागेत जाऊन शरदिनी फातर्फेकरला भेटायला सांगितलं असतं—

शरद : ही कोण?

बाबा : बरं, ते जाऊ दे. (शरदला) बाकी काय?

लीला : ( हसत ) बाबा म्हणत होते, चार महिने धाकट्या सुनेकडे राहायला जातो–
शरद : सोशल वर्कपुढं धाकट्या सुनेला वेळ आहे कुठं ?
बाबा : मी तसं काहीही म्हणालेलो नाही–
लीला : ( हसत ) मी त्यांच्या मनातलं काढतेय्, हो—
बाबा : असं...असं ! मला वाटलं, तू तुझ्या मनातलं सांगते आहेस !

[ शरद हसत पाय काढता घेतो, आणि हॉलमध्ये येतो. त्याची पाठ वळताच लीला त्याच्या पाठीमागे अंगठा आणि तर्जनी जुळवून ' पक्के आहेत ' याअर्थी खुणा करते. ]

लीला : ( हात नाचवीत ) पक्के आहेत ! ( आईला हे आवडत नाही. )
बाबा : कोण ?
लीला : हेच धाकटे !
बाबा : ती धाकटीही तिथं हेच म्हणत असेल– पक्के आहेत–
लीला : कोण ?
बाबा : थोरले आणि थोरली ! ( स्वतःशीच हसतात )

[ लीला स्वैपाकघरात जाते. ]

शरद : ( लीलाला– ती जाता जाता ) आज मासळी काय, वहिनी ?
लीला : ( जाता जाता ) कोलंबी !
शरद : वाः ! ( तुच्छ कटाक्ष टाकून लीला आत जाते. )
बाबा : ( आईला ) शरदनं काही हातावर ठेवलं का ?
आई : ( नोट दाखवीत ) दहा रुपये !
बाबा : नशीब ! गेल्या आठवड्यात आला होता, तेव्हा नव्हते दिले—
आई : कशाला द्यायला पाहिजेत ?
विशा : ( हॉलमध्ये ) एकदाचं काय ते सांगून टाक– सुटका होऊ दे–
शरद : ( हॉलमधून ) बाबा—
आई : तो हाक मारतोय्...काही दिलं हातावर, तर चिडून नको म्हणू नका—

[ बाबा हॉलमध्ये येतात ]

विशा : बसा– ( बसतात )
शरद : ( थंडपणे ) बाबा, आता तुमची कुठं तरी कायमची सोय करणं भाग आहे–

( एकदम कुत्रा भुंकतो. )

बाबा : माझ्याही ते लक्षात आलंय्– मीही प्रयत्नात आहे ..

शरद : तुमचे प्रयत्न राहू देत—

[ सगळेजण एकमेकांकडे बघत राहतात. ]

शरद : आता तर पैसेही जायला लागलेत—

बाबा : ( चिडून....पण खालच्या आवाजात ) काय बोलतोस ?

विशा : माझ्या बॅगेतले शंभर रुपये काढलेत–

बाबा : पण मी सांगितलं तुला—

विशा : काढल्यानंतर सांगितलं–

बाबा : काढण्याआधी सांगितलं असतं, तर तू कुलूप केलं असतंस बॅगेला–

विशा : आता मी बॅग आतच ठेवतो–

बाबा : ठेव ! आता मला पैसे नकोच आहेत...पंधरा दिवसांपूर्वी...ही....तुमची आई मोडून पडली....तेव्हा ( शरदला ) तुला फोन करून मी शंभर रुपये मागितले. देतो देतो, म्हणालास दोनदा आईला बघायला आलास... पैशाचं काही बोलला नाहीस...तू देणार नाहीस, हे मी आधीच ओळखलं होतं... म्हणून ( विशाला ) तुझ्याकडे मागितले....दर दोन दिवसांनी आठवण केली...देतो–देतो म्हणालास ! मला थांबायला वेळ नव्हता ! म्हणून मी तुझ्या बॅगेतले काढले...आणि मग तुला सांगितलं ! दुकानात येऊन मी गल्ल्यातनं हातउचल करू शकतो. दुकान माझ्या नावावर आहे. पण फोर्टमध्ये या दिवसांत जाणं कठीण. म्हणून तुझ्या बॅगेतले उचलले ! तू गल्ल्यातले उचलून बॅगेत ठेव–

विशा : आठवणीसाठी तुम्हांला सांगतो....आता दुकान माझ्या नावावर आहे–

बाबा : असेल ! मी कधी सही केली, मला आठवत नाही !

शरद : पण, बाबा, मी म्हणतो, तुम्हांला खर्च कसला आहे ? पैसे कशाला ? तर ही एवढी भाराभर लॉटरीची तिकिटं काढायची—

बाबा : लॉटरीच्या तिकिटांसाठी मी तुझ्याकडे पैसे मागितले नव्हते. लॉटरीसाठी मी तुझ्या आईकडून घेतो...रुपया....दोन रुपये....कधीतरी.

विशा : मग शंभर रुपये कशासाठी ?

बाबा : मला वर्तमानपत्रात... 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये एक जाहिरात द्यायची होती—

शरद : ( चमकून ) जाहिरात ? कसली ?

बाबा : ही मोडून पडल्यावर मनात एक कल्पना आली.... थांब... जाहिरात वाचूनच दाखवतो...

[ घाईघाईने आत येतात. दुसऱ्या कोटाच्या आतल्या खिशातून जाहिरातीचे कात्रण घेऊन येतात. तोपर्यंत दोघेही अचंबा करीत बाबांकडे खोलीतून बघत राहतात. आई बसल्या जागी डुलकी घेते आहे. ]

बाबा : ( कात्रण ) वाच– ( मध्येच–शरदला ) तुला शाळेत वाचनात नेहमीच कमी मार्क मिळायचे ! ( सगळे अवघडून हसतात ) ऐका– ( वाचू लागतात ) ज्यांना मुलं नाहीत... किंवा मुलं असूनही हौस आहे, अशी माणसं मुलं दत्तक घेतात. ज्यांना आई–वडील किंवा आजी–आजोबा नाहीत, किंवा असूनही हौस आहे, अशांनी आई–वडील किंवा आजी–आजोबा दत्तक का घेऊ नयेत ? इच्छा असल्यास सत्तर–पंच्याहत्तरीतले एक वृद्ध जोडपे दत्तक घेण्यासाठी उपलब्ध आहे... भेटा अगर लिहा... विठ्ठल विश्वनाथ इनामदार.... केअर ऑफ ( दोघांकडेही बघत मंद हसतात. )

विशा : ( चिडून ) केअर–ऑफ माझा पत्ता ? म्हणजे माझी बेअब्रू—

बाबा : ( मंद हसत ) नाही ! केअर–ऑफ शरद विठ्ठल इनामदार—

शरद : ( चिडून ) काय हे, बाबा ? विशाचं तरी नुसतं घड्याळाचं दुकान आहे.... मी मोठ्या इंटरनॅशनल फार्मास्युटिकल कंपनीचा अधिकारी आहे... ही जाहिरात वाचून माझी केवढी बेअब्रू होईल ? म्हणजे आम्हांला आमचे आई–वडील सांभाळता येत नाहीत, असा लोकांचा ग्रह होईल.

बाबा : ( मंद . विकट हसत ) बेट्यांनो, मला माझ्या अब्रूपेक्षा तुमच्या अब्रूचीच अधिक काळजी वाटते... ( जाहिरात दाखवीत ) डोळे फाडून बघा.... पोस्ट बॉक्स नंबर दिलाय्... अरे, केअर–ऑफच्या पुढं मी तुमची नावं कशी घालीन ?

शरद : अशा जाहिरातीनं कोणीही वेडा पत्र लिहिणार नाही !

बाबा : लक्षावधी शहाण्यांत एखादा वेडा असू शकतो, शरद ! किंवा लक्षावधी वेड्यांत एखादा शहाणा !

शरद : कोणीही लोढणं गळ्यात घेणार नाही....

बाबा : किमान एक तरी वेडा तयार झाला आहे !

विशा : कोण ?

बाबा : राघव करमरकर. नवरा–बायको प्रोफेसर आहेत—

शरद : त्यांचा काहीतरी अंतःस्थ हेतू असणार—

बाबा : अंतःस्थ हेतूसुद्धा एखाद्या वेळी उदात्त असू शकतो.

विशा : तरीसुद्धा, बाबा, मला वाटतं, तुम्ही दुसऱ्याच्या दारात असे आश्रितासारखं जाऊ नये—

बाबा : स्वतःच्या दारात–घरात आम्ही कोण आहोत . ?

शरद : ठीक आहे ! ते करमरकर कधी येतील, ते येवोत....तोपर्यंत आम्ही तुमची उत्तम सोय केली आहे—

बाबा : कुठं ?

शरद : पेटिट चॅरिटी होममध्ये !

बाबा : ठीक आहे ! पण आठ–दहा दिवस थांबा !

विशा : का ?

बाबा : करमरकर आम्हांला नेणार असतील...तर पेटिट चॅरिटी होममध्ये दुसरे कोणीतरी म्हातारे आमच्या जागी जाऊ शकतील...( विचार करीत ) गिरगावातल्या शान्तारामाच्या चाळीतल्या माझ्या दोन खोल्या मी तुला विकायला दिल्या नसत्या, तर आज तिथं आम्हांला राहता आलं असतं...एखादुसरा पेईंग–गेस्ट घेऊन...पण आम्ही प्रेमावर फार विसंबलो. असू दे !

शरद : करमरकर तुम्हांला नेणार असतील, तर ते पेटिट चॅरिटी होममधूनही नेऊ शकतात—

बाबा : पण आठ दिवसांनी मोठं काय होणार आहे ?

विशा : काही होणार नाही....त्या होममधली जागा जाईल—

शरद : मोठ्या वशिल्यानं मी ती मिळवली आहे–आत्ता ॲम्ब्युलन्स येईल.

बाबा : असं...असं ! तुमच्या आईला विचारा ! तिच्यासाठी मी इथं राहतोय्. ती नसती, तर मी कधीच गेलो असतो—

विशा : कुठं ?

बाबा : कुठंही...भगवी वस्त्रं पांघरून ! भगवी का ? ( दोघांकडे बघतात. दोघेही बघत राहतात ) भगवी वस्त्रं पांघरली, की प्रवासात तिकीट काढावं लागत नाही ! हात पसरला, की काही ना काही मिळतं... ( कडवट हसत–मंदसे ) भगव्या संस्कृतीचा केवढा हा फायदा ! तुमच्या आईला विचारा—

[ बाबा फोनकडे वळतात. दोघे खोलीत येतात. आई बसल्या जागी झोपून डुलक्या घेते आहे. ]

शरद : आई...आई—

आई : ( एकदम खडबडून जागी होत ) शरद, चाललास तू ? जेवलास ? जेवून जा—

शरद : हो—

आई : बसल्या बसल्या माझा एकदम डोळा लागला....ही पायाची कसली औषधं दिलीत, त्यानं दिवस–रात्र झोप येते–जेवून जा ! आज सुदैवानं लीलानं

कोळंब्या आणल्यात...तुला आवडतात....पाहिलास ना, घरभर केवढा वास घमघमतोय्....पोटभर जेव-( तेवढ्यात लीला बाहेर येते आणि विशाला खुणेने बाहेर बोलावते. विशा बाहेर जातो ) काय तुला सांगत होते...( डोक्यावर तर्जनी आपटत विचार करीत राहते. तेवढ्यात विशा–लीला यांचा दबलेल्या आवाजात संवाद. )

लीला : तुम्ही आपणहून राहायला सांगू नका ! ते राहिले, तर जेवतील...

विशा : तो जेवणारच––

लीला : मग रात्रीला मात्र काही नाही ! कोलंबी थोडीच आहे !

[ ती आत जाते. विशा खोलीत येतो. आईला अजून आठवत नाही. ]

आई : असं झालंय् माझं डोकं ! या औषधांनी तर अधिकच ! काय सांगत होते मी...?

शरद : मला पोटभर जेवायला सांगत होतीस––

आई : हो ! जेवून जा ! कोलंबीचा वास, बघ, कसा घमघमतोय्–आणि बघ...माझा डोळा लागला...आणि तू जेवून गेलास...तर एक सांगते...तू अधनं मधनं येत जा !....तू आलास, तर आम्ही तुझ्या मागं लागू...आणि तुझ्याकडे राहायला येऊ असं समजू नकोस–तू नजरेला दिसलास, तरी पुरे !

शरद : अग, तुम्ही आलेली मला नको का आहे ?

आई : एवढं तोंड भरून म्हणालास, हेसुद्धा खूप झालं !

शरद : पण मीनाचं तुला माहीत आहे...हॉस्पिटलातल्या सोशल वर्कपुढं तिला वेळ कुठं आहे ?...मी सारखा फिरतीवर ..

आई : आणि तू येतोस, तेव्हा काही तू द्यायला हवंस, असंही नाही–हे कुठं गेले ?

विशा : कुणाला तरी फोन करताहेत...

आई : विशा, हे वरचं...त्यांच्या अप्पांचं घड्याळ एकदा दुरुस्त करून दे, रे, त्यांना–त्यांची इच्छा आहे, तर––

विशा : आहे काय त्या डबड्यात ?

आई : टाइम नाही दाखवला, तरी चालेल...दोन टोले पडले, तरी ते आनंदानं नाचतील––

[ विशा ' बोल '–अशी शरदला खूण करतो. ]

शरद : आई, तुला एक सांगायचं होतं...

आई : ज़रा थांब!...या घटकेला आठवतंय्, तसं सांगून घेते...झोपेतच डोळे मिटले, तर मनात राहायला नको!....तुम्ही आमची दोन कौतुकाची पोरं... हा 'ताका' आणि तू 'मिका' (हसते) आठवतं ना? हे म्हणायचे ते-तासकाटा आणि मिनिटकाटा-ताका-मिका!....एका लिळयात बसवल्यासारखे राहा-हसून, खेळून! एकमेकांना अडीअडचणीला मदत करा! तू विशाला काही मदत कर!...तुला एमेरसोपर्यंन्त शिकवायचं, म्हणून त्याला शिकवलं नाही! यांची ऐपत होती कुठं?

शरद : आई, विशाला दुकान दिलंत, मी काही मागितलं का?

आई : अरे, दुकानात काय सुटणार? यांनी आयुष्य घालवलं, काय सुटलं?

[विशा गहिवरतो. डोळ्यावर बोट ओढत बाहेर जातो.]

शरद : ते दिवस गेले! आता बरं सुटतं! विशा काय बडबडतो, त्यावर जाऊ नकोस! त्याला सतत पिरपिरायची सवयच आहे!

विशा : (हॉलमध्ये- बाबांना) कुणाला फोन करताय्?

बाबा : करमरकरांना! कोणी उचलत नाही!

आई : बाहेर कोण बोलतंय्?

शरद : विशा आणि बाबा!

आई : तू जरा विशाला या घड्याळाची आठवण कर- त्यांची फार इच्छा आहे-

शरद : आई, तुला एक सांगायचं होतं-

आई : (अपेक्षेने त्याचा हात धरीत) काय? मीनाची काही गडबड आहे?

शरद : नाही-

आई : मग -?

शरद : तुला आणि बाबांना पेटिट चॅरिटी होममध्ये ठेवायचं ठरलंय्-

आई : (त्याचा हात गच्च धरते) तिथं कोण आहे?

शरद : तिथं म्हातारे राहतात.

आई : आपलं कोण आहे तिथं?

शरद : आपलं कोण असणार? कुणाला वेळ आहे?

आई : इथं का नको?

शरद : अग, लीलावहिनी तरी किती वर्षं करणार? तिला कंटाळा आलाय्-

आई : आमचा? (तो बोलत नाही.) अरे, त्या बॉबीच्या पुढ्यात दोनदा ताटली सरकवता...तशा दोन ताटल्या इथं सरकवा...आणि जा, कुठं जाणार, ते! आम्ही मेल्याचं उशिरा कळलं, म्हणून काही बिघडत नाही-

शरद : अग, पण पेटिट होममध्ये राहून तर बघ– पुढ्यात फुलं ठेवतात–

आई : प्लॅस्टिकची ?

शरद : नाही, खरी ! सकाळी गुडमॉर्निंग म्हणतात... अंड्याचा ब्रेकफास्ट... दुपारी मासळीचं...मटणाचं जेवण !

आई : आणि खर्च ?

शरद : फुकट ! अग, हे चॅरिटी होम आहे ! दुसऱ्यानं दिलेल्या देणग्यांवर चालतं– उत्तम जागा आहे....म्हाताऱ्यांसाठी !

आई : ( विषण्णपणे ) ठेवा...कुठंही ठेवा ! कढीनिंबाच्या पाल्यासारखी आमची गत ! फोडणीच्या वासापुरती गरज ! गरज संपली, की ताटाबाहेर...

शरद : काहीतरी बोलू नकोस.... तिथं एकदा राहून पाहा–

आई : तू औषधांच्या कंपनीत आहेस...तिथं मरायचं एखादं औषध का नाही तुम्ही काढत ? म्हणजे आमची एकदाची विल्हेवाट तरी लागली असती ! हे जगण्याचं दुःख तरी टळलं असतं–!

शरद : का तू, आई, मरणाच्या अशा गोष्टी करतेस ? मरण मागून मिळतं का ?

आई : ( आशाळभूतपणे ) मला एक सांग– गिरगावातल्या....आमच्या चाळीतल्या जुन्या दोन खोल्या त्यांच्याकडून परत घेता येतील का ? शेजाऱ्यांनी आम्हांला पाहिलं असतं...त्या वेळी त्या विकताना हे पुढलं आम्हांला दिसलं नाही... तिथं कुंटेबाईनं आम्हांला पाहिलं असतं...

शरद : कुंटेबाई वारल्यासुद्धा !

आई : वारल्या ? ( भकास नजरेनं पाहते आणि पदरात तोंड घेऊन मुळूमुळू रडू लागते )

शरद : आई, कुंटेबाई वारल्या, म्हणून तू रडते आहेस ?

आई : ( रडता रडता ) कळत नाही, रे...मी का रडतेय्, ते ? ( तो बाहेर जाऊ लागतो ) त्यांना तरी म्हणावं, माझ्या जवळ येऊन बसा...माझं काळीज कलकलतंय्–( तो बाहेर जातो )

[ बाबा फोन फिरवून फिरवून दमले आहेत. विशेष म्हणजे गांगरले आहेत, भेदरले आहेत. ]

बाबा : कुणी उचलतच नाही फोन–

विशा : बाबा, तुम्ही सुद्धा ! कुणी शुद्धीवर असलेला माणूस अशी जबाबदारी घेईल का ?

बाबा : का ? निरुपयोगी म्हणून ?

विशा : हो !
बाबा : म्हाताऱ्यांना एवढीही किंमत नाही ? आई-बाप म्हणजे कोणी नाही ?
शरद : तुम्ही दाजींना काय किंमत दिली ?
विशा : त्यांचं नाव तेवढं मला ठेवलंत...
बाबा : ते गेले....त्याच वर्षी तू झालास, म्हणून...त्यांनी पुनर्जन्म घेतला, असं वाटलं, म्हणून...
शरद : त्यांनी वैतागून जीव दिला...आणि आपल्या उत्तरक्रियेसाठी शंभर रुपये ठेवले. ते तुमच्यावर विसंबले नाहीत...
बाबा : त्याचा पश्चात्ताप मला होतोय्...त्या वेळी मी ते मिटवायला हवं होतं....त्यांना हवे होते, त्या वेळी मी पैसे दिले नाहीत...नव्हतेच त्या वेळी माझ्याकडे... पण त्यांची सगळी कर्जे नंतर मी फेडलेली आहेत...
विशा : ती त्यांच्या मृत्यूनंतर !
बाबा : दुर्दैव माझं ! दुसरं काय ?...म्हणून मी तुम्हांला सांगतोय्... मी आता ज्या यातना भोगतोय्... त्याचे धनी....म्हातारपणी तुम्ही होऊ नका—
शरद : माझी ती अपेक्षाच नाही ! मी बानूसाठी आता जे करतोय्...ते तिनं मला म्हातारपणी सांभाळावं, म्हणून नाही— ती काही इन्व्हेस्टमेंट नव्हे—
बाबा : शरद, हे तू आता म्हणतो आहेस....तू सत्तरीत येशील...तेव्हा मी नसेन... तुझी आईही नसेल...पण त्या वेळी तू वेगळं बोलशील....आज आम्ही जे म्हणतोय्, तेच म्हणशील ! थकशील...मोडशील, तेव्हा तुला कोण बघेल ?
शरद : वृद्धाश्रम—
बाबा : बोलणं सोपं आहे ! सत्तर वर्षे एका वेगळया वातावरणात गेलेली असतील.... एकाहत्तरावं वर्ष अगदी अनोळखी वातावरणात...जिथं मायेचा.... आपुलकीचा ओलावा नाही...विशा, शरद, हे कालचक्र आहे ! काल तुम्ही आमच्या वर अवलंबून होता...आज आम्ही तुमच्यावर अवलंबून आहोत...उद्या तुम्ही तुमच्या मुलांवर अवलंबून राहणार....याला अंत नाही !
शरद : तुम्हांला आई आत बोलावतेय्...
बाबा : जातो....
आई : ( आतून ) आलात का ?
बाबा : ( आत बघत ) येतो— विशा, आम्ही जातो ! अरे, कुठंही मरायचं आहे! जातो. एक सांगतो...जाण्याआधी... ते वडिलोपार्जित घड्याळ दुरुस्त करून ठेव—
विशा : बाबा, आहे काय त्या घड्याळात ?
बाबा : काही नसेल, तर ते भिंतीवर तसंच ठेव— अप्पांचं आहे ते...दाजींचं पॉकेट-

वॉच कुठं आहे ?

विशा : बघायला पाहिजे...

बाबा : त्याला सोन्याची चेन होती. ( विशा चपापतो. ) असू दे ! एक लक्षात ठेवा—माणसं मरतात...आयुष्य संपतं...या त्यांच्या वस्तू त्यांच्या आठवणी मागं जिवंत ठेवतात...भावनिक धागे पुढं चालू राहतात...भूतकाळाशी...वर्तमानकाळ ....भविष्यकाळ जोडला जातो...असू दे ! तुम्हांला कळायला अजून वेळ आहे !

लीला : ( एकदम उत्साहानं, आनंदानं बाहेर येत ) चला, जेवण तयार ! आज आपण सगळे एकत्र जेवू...आई—बाबांना सेंड—ऑफ्... ( कुत्रा भुंकतो ) बॉबी ऽ ऽ क्वाएट !

[ बाबा थकलेल्या पावलांनी खोलीत जातात. आईच्या शेजारी बसतात. तिचा हात हातात घेतात. ती त्यांच्या खांद्यावर मान टाकून रडू लागते. ]

बाबा : ( तिला थोपटत ) रुक्मिणी, तू रडू नकोस !

आई : ( रडत ) आता कुठं जाऊन मरायचं आपण ?

बाबा : मरायचं नाही, ग ! जगायचं....जगत राहायचं !

आई : पण कशासाठी ?

बाबा : त्याचं उत्तरं कुणाकडेच नाही, म्हणून !

आई : ( रडत ) बेवारशी जिणं घेऊन जगायचं कुठं तरी....कसला प्रसंग आलाय् आपल्यावर .

बाबा : नको तितकं जगायचा प्रसंग आलाय्, म्हणून.... ( त्यांचा एकदम गळा दाटून येतो )

लीला : ( आत येते ) तुम्ही आत येणार ? ( आई—बाबा वळून शुष्क नजरेनं तिच्याकडे बघतात ) सर्वांबरोबर एकत्र जेवायला— शेवटचं ? आई, तुम्हांला उचलून नेऊ ?

आई : ( वैतागाने...रडवेल्या आवाजात ) उचलून न्या एकदाचं....मसणात... !

लीला : ( हसत ) काही तरी काय ? मग इथं आणते ताटं—

आई : तुम्ही जेवा ! आम्हांला काही नको !

लीला : आई, कोलंबी आहे—

आई : माझ्या वाट्याची शरदला घाल...ह्यांच्या वाट्याची विशाला घाल—

लीला : थोडं जेवा....बरं वाटेल—

आई : नको, ग ! आमची भूक मेलीय्, जिभेची चवच गेलीय्—

लीला : बाबा, तुम्ही ?

बाबा : नको ! आम्ही तिथंच जेवू !
लीला : कुठं ?
बाबा : पेटिट चॅरिटी होममध्ये ! चॅरिटी फूड खाऊ !
लीला : ( बाहेर येत ) हे तुम्ही त्यांना जेवणं झाल्यावर सांगायला हवं होतं...
विशा : का ?
लीला : आता ते जेवण नको म्हणताहेत–

[ सगळेच एक क्षणभर अवघडून जातात. कुत्रा चमत्कारिक आवाजात भुंकतो आणि हेल काढतो. लीला ' बॉबी....बॉबी ' अशा हाका मारीत गॅलरीत जाते आणि बॉबीला थोपटताना दिसते. विशा आणि शरद अवघडून आईच्या खोलीत येतात. ]

विशा : आई...बाबा, तुम्ही दोन घास जेवून घ्या...
आई : नको, रे ! तुम्ही दोघे जेवून घ्या—
शरद : आई, नाहीतर तुझी कलकलणी सुरू होईल–
आई : होईल तर बरी– ( भ्रमिष्टपणे ) विशा, रंग्या आलाय् ?
विशा : तो पाचगणीला....
आई : हो...हो !

[ बाबा खुर्च्यांवरचे कोट काढून त्यांच्या घड्या करण्यात मग्न आहेत. मध्येच कोटाच्या खिशांतनं लॉटरीच्या तिकिटांचा जुडगा काढून बघतात. सर्वांचेच त्यांच्याकडे लक्ष जाते. ]

बाबा : ( शरदला ) तू विचारीत होतास, लॉटरीची तिकिटं का घेता ? लाख, दोन लाख मिळाले असते...तर पाडलोसला दाजींच्या नावानं शाळा बांधावी, अशी इच्छा होती... ( एक तिकीट दाखवीत ) एवढीच आमची इच्छा... ! एवढीच आमची स्वप्नं ! ( कडवट हसतात ) जा, तुम्ही जेवा ! तोपर्यंत आम्ही तयार होतो. आत्ता ॲम्ब्युलन्स येईल....आणि हे बघ, विशा, शरद, मीही स्ट्रेचरवर झोपूनच जाणार ! शक्य झालं, तर स्ट्रेचर खांद्यावर घ्या !
आई : ( एकदम हुंदका देऊन रडत ) भलतं काहीतरी अभद्र बोलू नका...
[ ती एकदम पदरात तोंड लपवते. पलीकडे कुत्रा अमंगल आवाजात हेल काढतो. आणि काळोख होतो. ]

## प्रवेश तिसरा

[ तेच स्थळ. दुसरा दिवस. संध्याकाळ. सहाची वेळ. लीला आतून बाहेर येते. आई–बाबांच्या खोलीत जाते. दिवाणाखालच्या ट्रंका ओढते. दिवाणावरच्या गाद्यांवरील चादरी काढते. गाद्यांना भोके पडून कापूस बाहेर आलेला दिसतो. तिथल्या तिथेच गाद्यांच्या घड्या करते. तेवढ्यात बेल वाजते. कुत्रा भुंकू लागतो. ]

लीला : ( दरवाज्याकडे जाता जाता ) चू ऽ ऽ प, बॉ ऽ ऽ बी !

[ लीला दरवाजा उघडते. विशा येतो. एकदम क्षणभर त्या खोलीकडे बघतो. ]

विशा : शरद नाही आला ?

लीला : ते कशाला येतील ?

विशा : तुझा फोन आल्यावर मी त्याला फोन केला...येतो, म्हणालाय्...

लीला : ( तुच्छतेने ) न यायला काय झालं ? मीना पुन्हा दिल्लीला गेलीय् ! हे इथं जेवणार आणि जाणार–

विशा : अग, पण धाकटा भाऊ तो–

लीला : मग धाकटा भाऊ थोरल्याला का नाही कधी जेवायला बोलावीत ?

विशा : गेल्या महिन्यात जेवलो आपण–

लीला : जेवलो ! डाळ–भात ! आणि आईकडनं आणलेली वालाची उसळ ! सीकेपी ! आणि फरसाणाबरोबर मिळालेली कुरकटची चटणी !....त्यांना आज बोलवायची काही गरज नव्हती !

विशा : हे बघ...ते करमरकर येणार त्यांच्याशी बोलताना शरद असलेला बरा.... म्हणजे मी एकट्यानं काही निर्णय घेतले. असं व्हायला नको !

लीला : माझंच चुकलं ! ( तो 'काय ?' या अर्थी बघतो. ) त्या करमरकरांनाच शरद-भावोजींच्या घरी या, म्हणून सांगायला हवं होतं !

विशा : ( बूट वगैरे काढीत ) आज मला एकदम दुसऱ्याच्या घरी आल्यासारखं वाटलं–

लीला : का ?

विशा : गेली कित्येक वर्षांची सवय ! बाहेरनं आल्याबरोबर आईबाबांच्या या खोलीकडे बघायची–

लीला : मला सुद्धा दिवसभर आज घर खायला आलं–

विशा : मग त्यांना बोलावू या का परत ?

लीला : ( चमकून ) आई–बाबांना ? बोलवा ना–

विशा : बोलवा ना ! ( खोलीकडे बघत ) त्या ट्रंकांचं काय करणार ?

लीला : काय करणार ? आईच्या ट्रंकेत फक्त जुनी लुगडी आहेत. दुसरं काहीही नाही. त्यांच्या हातांत दोन बांगड्या आहेत, तेवढयाच ! आणि गळयात माळ ।.... बाबांच्या ट्रंकेत फक्त कचरा आहे– उद्या जरीपुराणेवाल्याला बोलावते आणि देऊन टाकते... या ट्रंकांचाही आपल्याला काही उपयोग नाही–

विशा : आईची लुगडी ?

लीला : बोहारणीला देऊन भांडी घेते–

विशा : ( विचार करीत ) मला वाटतं, लीला, आपण घाई करू नये. दिसायला बरं दिसणार नाही ...

लीला : मला ही छोटी खोली बॉबीसाठी हवी आहे इथं मला या ट्रंका नकोत–

विशा : माळ्यावर टाकू–

लीला : आणि गाद्यांचा कापूस विकून टाकते–

[ तेवढ्यात दारावरची बेल वाजते. कुत्रा भुंकतो. लीला दरवाजा उघडते. शरद येतो.]

शरद : ( खोलीकडे बघत ) तुला एक ॲडिशनल खोली बरी झाली ! गॅलरी होती, असं वाटतही नाही !

विशा : ( थट्टेने हसत ) इथं आता बॉबी–

शरद : मग या दिवाणांचं काय करणार....?

लीला : ( गडबडीने ) रंग्या येतो सुटीत.... तेव्हा त्याला लागणारच.

शरद : दोन ?

लीला : दोन जोडून ... आखूड आहेत....

शरद : ( बॅग ठेवून ) मी जरा वॉश घेऊन येतो....( आत जातो )

लीला : ( हलक्या आवाजात ) दिवाण मारायला बघत होते. फुकटाफुकटी ! ( तो हसतो ) गाद्या मागितल्या, तर त्या मी माहेरनं आणल्या होत्या–

विशा : माहेरनं ?

लीला : सांगा तसं–

शरद : ( बाहेर येत ) हा करमरकर फोनवर म्हणाला काय ?

लीला : म्हणाले, विठ्ठलराव इनामदारांशी बोलायचं आहे....म्हटलं, ते बाहेर गेलेत. तर म्हणाले, त्यांना संध्याकाळी येतो, म्हणून सांगा–

शरद : एवढंच ?
लीला : हो !
विशा : या माणसाचा काय हेतू असेल ?
शरद : तोच मी कालपास्नं विचार करतोय्–
विशा : कदाचित बाबांकडे पैसा नाही, असं कळलं, म्हणजे तो पळ काढील–
लीला : पण ते प्रोफेसर आहेत, भाऊजी !
शरद : पैशापुढं कुणाचं काही सांगता येत नाही ! पैसा माणसाला सगळं काही करायला लावतो–
विशा : तो आला, म्हणजे आपण त्याला हे सांगू–
शरद : कदाचित.... आपल्याला असंही सांगता येईल, की आमच्या घरगुती गोष्टींत त्यानं लक्ष घालू नये !
लीला : खरं आहे ! त्याला म्हणावं, फार तर तुझ्या आईबापांना सांभाळ !

[ दारावरची बेल वाजते. कुत्रा भुंकतो. लीला दरवाजा उघडते. दारात राघव करमरकर. पस्तिशीतला. दिसण्यात साधा ]

राघव : मी करमरकर...राघव करमरकर...
विशा : ( उठून ) या...या... तुमचीच वाट बघत होतो...

[ शरद राघवला निरखून पाहतो आहे...जोखतो आहे ]

राघव : आपण त्यांचे चिरंजीव का ?
विशा : हो ... मी थोरला....विश्वनाथ ... हा धाकटा....शरद ! ही माझी पत्नी–लीला ! बसा ना– !

[ सगळे बसतात. लीला आत जाते ]

शरद : तुम्ही काय करता ?
राघव : मी आणि माझी बायको...आम्ही दोघेही लेक्चरर आहोत. फिलॉसॉफीचे !... नॅशनल कॉलेजमध्ये !
विशा : माझं फोर्टमध्ये घड्याळाचं दुकान आहे....इनामदार वॉच कंपनी !
राघव : आय् बिलीव्ह्, आय् हॅव सीन...गनबो स्ट्रीटमध्ये ?
विशा : राइट !... हा इंटरनॅशनल फार्मास्युटिकल्समध्ये पर्चेस ऑफिसर आहे–

राघव : गुड !
शरद : माझ्या बाबांच्याबद्दल तुम्हांला काय माहिती आहे ?
राघव : काही नाही !
शरद : त्यांच्याकडे काहीही...काहीही...म्हणजे काहीही पैसा नाही !
राघव : फारच उत्तम !
शरद : आम्ही दोघेही काही खर्च करू शकणार नाही !
राघव : त्याहून उत्तम ! ( दोघे चमकतात. ) कारण आमची कसलीच अपेक्षा नाही !
विशा : पण यात तुम्हांला फायदा काय ?
राघव : कशात ?
विशा : दुसऱ्याचे आई–बाबा सांभाळण्यात– ?
राघव : छे...छे ? तो विचारच नाहीए. पैशाचा.... नफातोट्याचा विचार आणला, की भावना दूषित होतात...
शरद : पैशाचा विचार नाही, तर मग हे सारं कशासाठी ?
राघव : जस्ट फॉर द सेक ऑफ इट् ! दोन म्हाताऱ्यांचं जीवन जमेल तेवढं सुखी करायचं–

[ दोघांनाही काही कळत नाही. ते एकमेकांकडे बघून हसतात. ]

शरद : तुमचे आई–वडील ?
राघव : माझ्या आईला मी पाहिलेलंच नाही ! मी पंधरा दिवसांचा होतो, तेव्हाच ती गेली.
शरद : आणि वडील ?
राघव : ते घर सोडून गेलेत–
शरद : भांडून ?
राघव : छे ! ते असे दोनतीनदा गेलेले आहेत–
शरद : ज्यांना स्वतःचे वडील सांभाळता आले नाहीत–
राघव : तसं नाहीए ते ! आई गेली, तेव्हा मी पंधरा दिवसांचा होतो. तेव्हा तर भांडण होण्याचा प्रश्न नव्हता; पण त्या वेळी ते गेले, ते पाच वर्षांनी आले. मी शेजारच्या गाडगीळांच्या कुटुंबात वाढलोय्. त्यांनी का माझी जबाबदारी घ्यावी ? शेवटी एकमेकांच्या सुखासाठी कोणी ना कोणी हात द्यावा लागतो...
विशा : तुमचे वडील परत आले, तर ?
राघव : येतीलच ते कधी ना कधी–
विशा : मग ?

शरद : आमच्या आई–बाबांना परत करणार ?
राघव : नो...नो ! सर्वजण आम्ही एकत्र राहू ! ऑलरेडी...आमच्या शेजारचे बाबुराव जोशी येऊन जाऊन आमच्याकडे असतात ! ते एकटेच आहेत–

[ विशा आणि शरद यांना चांगुलपणाची कल्पनाच येत नाही. ते एकमेकांकडे बघतात आणि चमत्कारिक हसतात. ]

शरद : ( हसत ) इट् लुक्स फनी.... !
राघव : इट् डज लुक फनी.... या पैशाच्या जगात !
शरद : मी तुम्हांला एक गोष्ट सांगितली, तर तुम्हांला तो उद्धटपणा वाटेल का ?
राघव : नाही ! सांगा ना–
शरद : मला असं वाटतं...सॉरी, आम्हांला असं वाटतं, की आमचे आई–बाबा ही आमची घरगुती बाब आहे, आणि त्यात तुम्ही पडू नये !
राघव : आता मी तुम्हांला एक गोष्ट सांगितली, तर तुम्हांला तो उद्धटपणा वाटेल का ?
शरद : ( नापसंतीने ) सांगा–
राघव : ज्या दिवशी तुमच्या बाबांनी ' आम्हांला दत्तक घ्या ', अशी जाहिरात दिली, त्या दिवसापासून ही बाब तुमची घरगुती राहिलेली नाही ! ज्यानं ज्यानं ती जाहिरात वाचली, त्याच्या त्याच्या हेही लक्षात आलं असणार, की या म्हाता-ऱ्यांकडे पैसे नाहीत...इतकंच नव्हे, तर ही जाहिरात छापण्यासाठी लागणारे ऐंशी–नव्वद रुपयेही त्याने गुपचूप मुलाच्या खिशातून, पेटीतून काढले असणार ! ( दोघेही एकमेकांकडे बघून चपापतात ) तुमच्या बाबांकडे पैसे असते, तर ही जाहिरात छापण्याचा प्रसंगच आला नसता–

[ क्षणभर एकदम शांतता पसरते. ]

शरद : ( हसत ) आमच्या आई–बाबांना तुम्ही आपले आई–बाबा मानणं–
राघव : ( हसतच ) चुकताय् तुम्ही–
शरद : काय ?
राघव : तुम्ही त्यांना आपले आई–बाबा मानीत नाही, म्हणून मी मानणार आहे–
शरद : तरीसुद्धा मला हा शुद्ध वेडेपणा वाटतोय्–
राघव : अण्णा कर्वे–
शरद : हे कोण ?
राघव : धोंडो केशव कर्वे...

शरद : हो....हो! तेही खूप जगले....

राघव : (हसत) तुम्हांला तेवढीच माहिती दिसतेय्–अहो, ते नुसतेच जगले नाहीत. जगानं फेकलेल्या स्त्रिया त्यांनी आपल्या मुली मानल्या... तेव्हा तेही वेडेच ठरले होते. मी त्यांच्याशी माझी तुलना करीत नाही. तरीसुद्धा.... असा वेडेपणा कुणी तरी करायला पाहिजे–

शरद : आम्ही विरोध केला, तर–?

राघव : त्यांना मला भेटलंच पाहिजे! ते आत्ता आहेत कुठं?

विशा : आमचा विरोध आहे, असं समजू नका!... पण आम्ही कालच त्यांची दुसरीकडे चांगली सोय केलेली आहे ..ती तुम्ही डिस्टर्ब करू नका!

राघव : ते आता कुठं आहेत?

विशा : पेटिट चॅरिटी होममध्ये–

राघव : अरेरे–

विशा : का?

राघव : ते आठ–पंधरा दिवसांतच खलास होतील–

शरद : मुळीच नाही! दे आर् व्हेरी हॅपी–

राघव : माझ्या एका मित्रानं आपल्या वृद्ध वडिलांना तिथं ठेवलं होतं...तिथलं विकलांग वातावरण....शुष्क जीवन...समोर मरणारी माणसं...

शरद : तसं काही नाही! तिथं सकाळी गुडमॉर्निंग म्हणतात—

राघव : हो! पण ज्याला गुडमॉर्निंग म्हटलं, तो मेलेला होता, हे गुड इव्हिनिंगला कळतं–

शरद : नॉन्सेन्स....अंड्याचा ब्रेकफास्ट...फिश....मटण...चिकन...सगळं डोनेशन्सवर....

राघव : पण माझ्या मित्राचे वडील आठ दिवसांत मेले–

शरद : मग त्यांना का नाही तुम्ही दत्तक घेतलं?

राघव : मला ती कल्पना...वृद्ध आई–वडिलांना दत्तक घेण्याची कल्पना मला कधी सुचलीच नाही! तुमच्या बाबांची ती जाहिरात मी वाचली आणि त्या कल्पनेनंच मी झपाटलो...इरावतीशी मी चर्चा केली....इरावती म्हणजे माझी बायको... आणि त्याच दिवशी अर्ज टाकला– (थांबून) पेटिट चॅरिटी होम... म्हणजे ते दादाजी रोडवरचं ना?

विशा : हो–

राघव : (उठतो) मी त्यांना भेटतो... त्यांना तिथंच राहायचं असलं, तर ठीक–यायचं असलं, तर–

शरद : पण ते आम्हांला आवडलं नाही, तर?

राघव : ( हसत ) त्यांचं वय एकवीस वर्षांचं असेल ना ? ( हसतो )

[ तेवढ्यात कुत्रा करुणाजनक आवाजात हेल काढून रडल्यासारखा ओरडतो. विशा आणि शरद वळून गॅलरीकडे बघतात. ]

राघव : तुमचा कुत्रा का ? आजारी आहे ?
विशा : छे–

[ गॅलरीत लीला आलेली दिसते. ती 'बॉबी...बॉबी' म्हणत त्याला गोंजारते. ]

राघव : तो चमत्कारिक ओरडला....ठीक आहे...निघतो मी—

[ तेवढ्यात बेल वाजते. कुत्रा पुन्हा तसाच हेल काढून रडल्यासारखा ओरडतो. विशा दरवाजा उघडतो. दारात बाबा आणि आई. बाबांच्या हातात कपड्यांचे बोचके आहे. आई कुबड्यांच्या आधाराने आत येते. ]

विशा : आई...बाबा, तुम्ही ?
लीला : ( धावत येत ) आई, तुम्ही ?
शरद : अग, कळवायचं तरी...

[ राघव गडबडीने आईला आधार देऊन बसायला बैठक देतो. कुबड्या बाजूला ठेवतो. ]

विशा : अग आई, तुला ह्या नवीन कुबड्या कोणी दिल्या ?
आई : कोण जाणे ! कोणी तरी एक पोरगा... यांच्यासारखा ( करमरकरांसारखा ) सकाळी आला...आणि म्हणाला, आई, या कुबड्या घ्या–
विशा : अग, पण तो होता कोण ?
आई : त्यानं नाव सांगितलं नाही !
बाबा : विशा, त्याचं नाव चांगुलपणा...ज्याच्यामुळं हे जग चाललं आहे ! ( राघवकडे वळून ) तू करमरकर का ? राघव ?
राघव : हो–
बाबा : काल एकसारखा फोन करीत होतो. कोणी उचलत नव्हतं–
राघव : आमचा फोन बिघडलाय्, बाबा–

२२०९२ १।५८८
नाटक


: बाबा, तुम्ही तिथनं का आलात? पेटिट होममधून !

विशा : आणि त्यांनी तुम्हांला सोडलं कसं ?

शरद : त्यांना माहीतसुद्धा नाही...आम्ही तिथनं निसटलो, ते—

आई : पण निसटला कसे ?

विशा : आम्ही मराठे आहोत, विशा ! आम्ही कोठून, कसे निसटू—( हसत )

बाबा : अरे विशा, शरद कुठं गेला ?

आई : हा काय...

विशा : शरद, अरे, काय सांगतोस, गुडमॉर्निंग म्हणतात, म्हणून ? आज सकाळी ज्याला गुडमॉर्निंग म्हटलं, तो काल मेला होता—

आई : कर्म आपलं—अरे, एकाला मी विचारलं, तुम्ही इथं कधी आलात ? तो बोलला नाही. म्हणून नुसता हात लावला, तर तो धाडकन ओंडक्यासारखा खाली कोसळला...कधी मेला होता, कोण जाणे...

बाबा : मरावं....मरण लवकर यावं, असं वाटतं...पण अशा मरणाची भीती वाटते, रे ! डोळ्यांदेखत माणसं मरत होती...! आम्ही एक क्षण तिथं राहिलो असतो, तर भीतीनंच आम्हीही मेलो असतो !

आई : मग तुम्ही आता इथं राहणार ? ( तिचा चेहरा करवादतो. )

लीला : राघव करमरकर, तुमचा काय विचार आहे ?

बाबा : मी तुम्हांला न्यायलाच आलोय्, बाबा !

राघव : कधी ? कधी नेणार ? उद्या...परवा ?

बाबा : आत्ता....या क्षणी...तुमचं काही सामान आहे का ?

राघव : त्या दोन ट्रंका—

बाबा : आणि गाद्या—

आई : गाद्या नकोत—( तो आत जाऊन दोन ट्रंका उचलून हॉलमध्ये आणून ठेवतो आणि ) बाबा, तुम्ही थांबा ! आत्ता टॅक्सी घेऊन येतो—

राघव : उद्या गेलो, तर नाही का चालणार ?

आई : का ?

बाबा : आज अमावास्या आहे...

आई : तुला पंचांग कुठं मिळालं ? आणि पेटिट होममधून निघताना अमावास्या नव्हती

बाबा : आपण आपल्या घरी येत होतो....

आई : आताही आपण आपल्याच घरी जातोय्— विशा, ते भिंतीवरचं माझं घड्या

बाबा : काढ... ( विशा स्टूल घेऊन येतो. ) आणि दार्जाचं ते पॉकेट-वॉच

गेलं ? सोन्याची साखळी जाऊ दे ! पॉकेटवॉच शोधून काढ...कुठं

राघव : आत्ता टॅक्सी घेऊन येतो, बाबा ! थांबा, आई !

बाबा : बाबा !...वेगळी हाक वाटली ! ( राघव वळणार, तोच–) थांब, जरा इथं ये, बाळा ! तू टॅक्सी आणीपर्यंत माझा प्राण गेला, तर मनातलं तसंच राहून जाईल...जरा जवळ ये... ( तो येतो– दोन्ही थरथरत्या हातांत त्याचा चेहरा धरतात...त्याच्या नजरेत काहीतरी शोधतात. दाटलेल्या आवाजात–) खूप... खूप दिवसांनी ' बाबा ' ही वेगळी हाक ऐकू आली ! राघवा, पोरा, आई-बाबा या दोन अक्षरी निरर्थक...निरुपयोगी शब्दांना तू आज महासागराएवढा अर्थ दिलास . परमेश्वर तुझं कल्याण करो ! कोट कोट कल्याण करो !

[ थरथरत त्याच्या कपाळाचे चुंबन घेतात आणि— ]

पडदा

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[सकाळची वेळ. मध्यम वस्तीतला प्राध्यापक दांपत्याला शोभेल, असा तळमजल्यावरचा तीन–चार खोल्यांचा ब्लॉक. हॉल. मध्यम स्वरूपाचे फर्निचर. टीव्ही, फोन वगैरे. पुस्तकांचे शेल्फ. हॉलमधून एक दरवाजा स्वैपाकखोलीकडे. दुसरा दरवाजा दुसऱ्या खोल्यांकडे. हॉलला लागून समोरच एक तिरकी आखूड गॅलरी आहे. तिथे एक स्टूल ठेवलेले दिसते. एका बाजूला दोन खुंट्या आहेत. त्यावर बाबांचे जुने कोट लोंबत आहेत. एक आरामखुर्ची आहे. दोन स्टुले आहेत.
पडदा वर जातो, तेव्हा बाबा घरगुती वेषात शांतपणे फेऱ्या मारीत आहेत. फेऱ्या मारता मारता—]

बाबा (आपल्या हातांचे तळवे बघत) 'कराग्रे वसते लक्ष्मी। करमध्ये सरस्वती। करमूलेश्च गोविंदः। प्रभाते करदर्शनम्॥'

[हे चालू असताना आतून राघव येतो. त्याच्या हातात छोटासा आल्बम आहे]

राघव : (येता येता–) हे नेहमी म्हणता? (कोचावर बसतो)
बाबा : छे! आजच आठवलं —

[एका कोटाच्या खिशात काहीतरी शोधू लागतात. राघव आल्बममधले फोटो पाहत असताना आतून इरावती येते. ती सकाळच्या, जेवण तयार करण्याच्या गडबडीत आहे. नेसण खोवलेले. बाबा काहीतरी खिशात शोधत आहेत, ते पाहून....]

इरावती : बाबा—
बाबा : ( एकदम वळून....) लीला....ओऽऽ...इरावती...काही म्हणालीस ?
इरावती : तुम्हांला, बाबा, काही हवंय् का ?
बाबा : ( गोंधळून ) काय ?
इरावती : काही शोधताय् का ?
बाबा : ( गोंधळून ) आं... हो— हो !
इरावती : काय हवंय् ?
बाबा : तेच विसरलोय् ! असू दे !
राघव : ( लक्ष जाते ) बाबा—
बाबा : ओ...
राघव : इथं या, बसा ! तुम्हांला फोटो दाखवतो.

[ येऊन राघवच्या शेजारी बसतात. ]

इरावती : ( खुंटीवरचे दोन कोट काढून ) बाबा, हे कोट आत ठेवते...चालेल ?
बाबा : ( ते आत ठेवलेले त्यांना नको असते ) हो...हो...चालेल. बाहेर वाईट दिसतात.

[ इरावती दोन्ही कोट आत घेऊन जाता जाता खिशात हात घालते आणि हसते. ]

बाबा : सांभाळ ! कधी कधी उंदराचं पिल्लू असतं आत—
इरावती : ( लॉटरीच्या तिकिटांचा जुडगा दाखवीत ) किती लॉटरीची जुनी तिकिटं बघा—
राघव : ( हसत ) नेहमी लॉटरीची तिकिटं घेता ? रोज ?
बाबा : लाखाच्या वर ! पंधरा–वीस हजारांत इंटरेस्ट नाही ! लाख–दोन लाख लागले, तर पाडलोसला दाजींच्या नावानं शाळा बांधायचा विचार आहे—( इरावती आत जाता जाता ) रखमाबाई काय करते आहे ?
इरावती : शेंगा सोलताहेत...
बाबा : तिला जरा चालायला लाव ! नाहीतर कायमची लंगडत राहील.
इरावती : हो...हो...( आत जाते )
राघव : ( आल्बम दाखवीत ) हा मी ! एक महिन्याचा.... या माई गाडगीळ. यांनी वाढवला मला— कारण मी पंधरा दिवसांचा असताना आई वारली.... आणि नाना पळून गेले....

बाबा : ( काहीतरी आठवून ) थांबा हं! ....( उठून आत जातात. )
राघव : तुम्हांला काही पाहिजेय् का ?

[ ते काही न बोलता आत जातात. राघव आल्बम तसाच धरून दरवाज्याकडे बघत राहतो. एवढ्यात बाबा दोन्ही कोट लोंबत घेऊन येतात आणि पूर्वीप्रमाणे खुंट्यांवर टांगतात. ते बघून राघव पान हाल्वीत गमतीने हसतो आणि इरावतीला हाक मारतो. ]

राघव : इरा...

[ इरावती दरवाज्यात येते. तो तिला खुणेनेच दाखवतो. दोघेही खूप हसतात. बाबांना पत्ता नाही. ते कोट टांगून खिशात चाचपतात. इरावती हसत हसत आत जाते. बाबांना खिशात रुपया, दोन रुपये अशा दहा रुपयांच्या नोटा सापडतात. ]

बाबा : ( चमकून ) अरे...राघव, खिशात कुणाचे तरी पैसे चुकून आलेत—
राघव : चुकून नाहीत ! इरावतीनं ठेवले असतील —
बाबा : कशाला ?
राघव : तुम्हांला किरकोळ खर्चाला...
बाबा : ( अवघडून ) छे—छे ! हे बरं नाही. आणि मला कसला आलाय् खर्च ?
राघव : असू देत, बाबा !
बाबा : बरं ( पैसे कोटाच्या खिशात ठेवतात )
राघव : या— फोटो बघा ..

[ येता येता परत वळतात. खिशातून दोन रुपयांची नोट आणतात आणि ती राघवला देऊ लागतात. ]

राघव : कशाला ?( राघवला हसू येते ).
बाबा : संध्याकाळी येताना मंजूच्या गाडीवरून–मंजू म्हणजे लांब पडेल का ? टॅक्सीनं गेलास, तर जवळ पडेल....कसंही...दोन पुड्या आण.... एक पुडीत दोन बटाटेवडे असतात...एक तुला...एक इरावतीला...एक तुझ्या आईला... दोन मला....
राघव : ( हसत ) म्हणजे पाच झाले !

बाबा : पाच होतात का ?... कारण मला दोन लागतातच.... एक खाल्ला, की तुझी आई काहीतरी खुसपटं काढून मला चिडवणार... चिडलो, की मला भूक लागते. मग आणखी एक वडा खावा लागतो !...हे घे– ( पैसे देतात )

राघव : ( पैसे घेत नाही ) ते ठेवा तुम्ही ! मी माझ्या पैशानं आणतो.

बाबा : नाही...नाही ! माझ्या पैशानंच आणले पाहिजेत–( दोन रुपये त्याच्या हातात कोंबतात आणि–) आणि एक लक्षात ठेव ! असे वडे रोज मिळायचे नाहीत ! सवय वाईट !...मंजू म्हणजे आयडियल बुक कंपनीच्या गल्लीत !

राघव : ( हसतो ) आलं लक्षात ! ( फोटो दाखवीत–) हा माझ्या वाढदिवसाचा– पहिला वाढदिवस !

बाबा : तुझ्या आईचा ? फोटो ?

राघव : तिचा कुठंच नाही !

बाबा : आणि नानांचा ?

राघव : त्यांचाही नाही ! कधी कुणी काढलाच नाही त्यांचा फोटो.

बाबा : ते पळून का जातात ?

राघव : काही कळत नाही ! इथं कधी येतात, तेव्हा सुद्धा कधी बोलत नाहीत. त्या स्टुलावर बसून असतात. ( गॅलरीतल्या स्टुलावर )

बाबा : पुन्हा लग्न केलं नाही–?

राघव : नाही !– माझं लग्न झाल्यावर—एकदा म्हणाले, लग्न करायचंय्—

बाबा : मग ?

राघव : मी हसलो ! हसता नये होतं !...मग एकदा पळून गेले, ते गेले.

बाबा : कुणा शाळेतल्या मुलीवर प्रेम वगैरे होतं ?

राघव : कल्पना नाही ! पण नसावं ! का ?

[ बाबा न बोलता उठतात आणि आत जातात. तेवढ्यात फोन वाजतो. राघव फोन घेतो. तेवढ्यात फोनचा आवाज ऐकून इरावतीही बाहेर येते. ]

राघव : हॅलो ! हो–हो ! मी जाणार आहे...थांबा हं, विचारतो ( फोनवर हात ठेवून ( इरावतीला– ) तू येणार आहेस का ?

इरावती : कॉन्फरन्सला ना? कशी येणार ? इथं यांच्यासाठी मला राहावं लागेल...तूच जा...

राघव : ( फोनवर ) नाही ! ती नाही येणार ! हो...हो...मी येईन....दिल्लीचं रिझर्व्हेशन मात्र बघा...हो...हो...थँक्स् !

[ फोन ठेवतो. फोनवर शेवटले वाक्य बोलत असताना इरावती आत जाते

आणि बाबा कागदपत्रांचे एक पुडके घेऊन येतात. ]

बाबा : ( राघवला ) इकडे ये ... तुला दाखवतो ! ( पुडक्यातून एक जुनाट फोटो दाखवतात. ) हे दाजी...माझे वडील !

राघव : तुम्ही एकुलते एक !

बाबा : हो ! दाजी सुद्धा माझे एकुलते एक वडील ! ( राघव गमतीने हसतो ) ही बघ...त्यांच्या जाकिटातून ही साखळी...सोन्याची साखळी लोंबतेय् या खिशात त्यांचं पॉकेट वॉच असायचं ! त्यांनी ते कुठून आणलं होतं, कोण जाणे ! सोन्याची केस होती...पहिल्या युद्धात यांनी फौजेत रिक्रूट भरती केली, म्हणून कलेक्टरानं–ब्रिटिश कलेक्टर–पाच एकर इनाम दिलं. म्हणून आम्ही इनामदार....नाहीतर आमचं पूर्वीचं नाव पाडलोसकर ! हे इनाम गहाण-पडलं होतं...

राघव : का..गहाण का ?

बाबा : ते आमच्या कोकणी लोकांचं असतंच ! काही ना काही गहाण टाकल्याशिवाय आमचं भागतच नाही ! तर ते सोडवण्यासाठी त्यांनी माझ्याकडे त्या काळात दोन हजार रुपये मागितले. ( गळा दाटतो ) मी पाठवू शकलो नाही. नव्हतेच माझ्याकडे...मी दुकान घातलं होतं, तेच रायकरांकडून पाचशे रुपये कर्जाऊ घेऊन...तेवढ्यानं दाजी वाकडे झाले...माझं नाव टाकलं...मी त्यांचं टाकलं. आम्ही कोकणी, म्हणजे तेरमी ! पुढं काय झालं, कोण जाणे ! कोण म्हणतात, घरावर जप्ती आली होती ! दाजींनी विहिरीत उडी टाकून जीव दिला ! ( डोळ्यांवर बोट ओढतात ) तुला मी आणखी दोन रुपये देतो– याला ( फोटोला ) फ्रेम करून आणशील ? खोलीत लावीन !

राघव : द्या ( फोटो घेतो ) अजून बाबुराव जोशी आले नाहीत...

बाबा : ( त्याचा हात धरून ) तो इथं रोजच्या रोज येतो ?

राघव : त्यांना जवळचं कुणी नाही ! एकटेच आहेत.

बाबा : का ?

राघव : स्वातंत्र्यसैनिक ! बरीच वर्षं तुरुंगात काढली !

बाबा : पण सुखी आहेत ! हसत असतात.

राघव : ( उठत ) सगळेच हसतात, ते सुखी असतात असं नाही, बाबा !

[ बाबा त्याच्याकडे फक्त बघत राहतात. तेवढ्यात इरावती येते. ]

इरावती : राघव, तू येतो आहेस ना जेवायला ?

राघव : हो...
इरावती : बाबा, तुम्ही....
बाबा : येतो....
इरावती : तुम्ही मग बसा...आईबरोबर! आत्ता दहा वाजताहेत .. आम्हांला कॉलेजला जायचं, म्हणून लवकर जेवतोय् आम्ही!
बाबा : हो...हो!
इरावती : बाबुरावही जेवायला असतील! आज उशीर का बाबुरावांना? (बेल वाजते.)
राघव : शंभर वर्षे आयुष्य आहे!

[ दरवाजा उघडतो. बाबुराव जोशी येतात. साधारणतः सदुसष्ट वर्षांचे वय. प्रकृती किरकोळ. अंगावर आखूड पायजमा. सफेत सदरा, छातीवर तटट् भरलेले दोन खिसे. कपाळावर गांधी टोपी. ]

राघव : शंभर वर्षे आयुष्य आहे! (बाबुराव फक्त हसतात. राघव वळून बाबांना– ) ऐकू आलं नाही! कानात ओरडल्याशिवाय काही ऐकू येत नाही!
बाबुराव : काही म्हणालात?
राघव : (ओरडून कानात) शंभर वर्षे आयुष्य आहे–
बाबुराव : असं...असं! (मोठ्याने हसतात)
राघव : (कानात ओरडत) आत्ता इरा म्हणत होती, अजून बाबुराव आले नाहीत....
बाबुराव : असं...असं! हां...हां! (मोठ्याने हसतात.) तुम्ही अजून गेला नाहीत?
राघव : (ओरडून) मी अकराला जातो.
बाबुराव : माहीत आहे! पण काही तरी विचारायचं, म्हणून विचारलं. (सर्व हसतात)
इरावती : त्यांना आज इथं जेवा, म्हणून सांगा–
राघव : (ओरडून) इरा म्हणतेय्, तुम्ही आज इथंच जेवा.
बाबुराव : जेवायलाच आलोय् –
राघव : तोपर्यंत गप्पा मारा...
बाबुराव : थापा मारा? (हसतात.)
राघव : (हसत) गप्पा....मारा. (इरावती हसत आत जाते.)
बाबुराव : ठीक आहे! (उगाच मोठ्याने हसतात.)
राघव : तुम्हांला पाव हवाय् का?
बाबुराव : आणलाय्... (पिशवीतला चार आणेवाला पाव काढून दाखवतात.)
राघव : (आत जाता जाता बाबांना) ॠकपॉट आहे...
बाबा : (न कळून) जॅकपाट?

राघव : ( हसत– ) क्रॅकपॉट !
बाबा : ऐकेल....

[ हाताचा अंगठा हालवीत ' काही ऐकू येत नाही ', असे दर्शवीत आत जातो. तेवढ्यात इरावती आईला हाताला धरून आणते. आईच्या पायाचे प्लॅस्टर काढलेले आहे. ती लंगडत येते आणि बाबांच्या उजवीकडे बसणार, तोच...]

बाबुराव : इकडे डावीकडे...वामांगी रखुमाई...( खूप हसतात )

[ आई हसत डावीकडे बसते. बाबुराव तिला बघत राहतात ].

बाबा : ( आईला...जरा खालच्या आवाजात ) तू आत्ता बाहेर कशाला आलीस ?
आई : ( गडबडून ) का ?
बाबा : तू आलीस, की तो सारखा तुझ्याकडे कावळ्यासारखा बघत राहतो...
आई : (वैतागून) चला ! जाते मी आत...
बाबा : ( वैतागून ) आता बस ! नाहीतर त्याला संशय येईल...
बाबुराव : मला काही म्हणालात ? ( बाबांच्या उजवीकडे बसतात )
बाबा : ( ओरडून ) नाही ! आम्ही आपसांत बोलतोय्...( खोकतात )
बाबुराव : बोला...बोला ! ( हसतात ) कसं काय, रखुमाबाई, तब्येत काय म्हणते ? ( हसतात. )
बाबा : ( फुरंगटून ) बघ ! तुझ्याशी बोलण्याची घाई ..
आई : मी आत जाऊ का ?
बाबा : नको ! ( बाबुरावांना ) तुम्ही कुठल्या कुठल्या तुरुंगांत होता ? ( खोकतात )
बाबुराव : अनेक तुरुंग झाले...पण मुख्य म्हणजे नगरचा...तिथं पंडित नेहरू... शंकरराव देव...मी...
बाबा : करायचे काय ?
बाबुराव : मी ?
बाबा : नाही. नेहरू, देव...
बाबुराव : फूटबॉल खेळायचे...
बाबा : तुम्ही सुद्धा ? ( खोकतात )
बाबुराव : नाही ! फूटबॉल लांब उडाला, म्हणजे मी आणून द्यायचो...

आई : ( वैतागून ) कशाला खोकता ..आणि ओरडता ?
बाबा : मी त्याच्याशी बोललो नाही, तर तो तुझ्याशी बोलणार...
आई : ( हसते ) तुम्ही माझ्याशी बोला–
बाबा : आज जेवण काय आहे ?
आई : भात...डाळीची आमटी...शेकटाच्या शेंगा घालून...मी केलीय् सारस्वती पद्धतीची ! बटाट्याचा रस्सा ! विशाला आवडतो...आणि फरसबीची भाजी !
बाबुराव : फरसबीची भाजी, उत्तम !
आई : ( दचकून ) ह्याला ऐकू येतं, की काय ?
बाबा : ( बाबुरावांना ) तुम्हांला ऐकू आलं ?
बाबुराव : काय ?
बाबा : फरसबीची भाजी आहे, ते ?
बाबुराव : मला फरसबीची भाजी आवडते, ते सांगत होतो. ( हसतात )
बाबा : ( आईला ) नाही त्याला ऐकू येत ! ठार बहिरा आहे. ( दोघांच्याकडे बघत ) पण तो तुझ्याकडे बघतोय्, बघ, कसा...

[ आई बाबुरावांकडे चटकन बघते आणि गमतीने ती स्वतःशीच हसते. ]

बाबुराव : ( तिला ) हसताय् कशाला ? ( ती खाली मान घालून खूप हसते. )
बाबा : ( चक्रावतात ) हसू नकोस ! मग त्याला उत्तेजन मिळतं ! स्टॉप इट् !

[ ती तोंडावर पदर धरून गप्प राहते. तेवढ्यात कपडे करून कॉलेजात जाण्यासाठी राघव आणि इरावती येतात. इरावती टेबलावरची पुस्तके बघते....कुठली घ्यावी, ते. तेवढ्यात.... ]

राघव : बाबा, तुम्ही गेल्या महिन्यात इथं यायला हवं होतं...
बाबा : का ?
राघव : आम्ही गेल्या महिन्यात इथं बाबुरावांचा सदुसष्टावा वाढदिवस धूमधाम साजरा केला. ( बाबुरावांच्या कानात–) तुमचा वाढदिवस !
बाबुराव : वा: ! मोठी मौज आली होती, विठ्ठलराव– रखुमाईचा वाढदिवस कधी ?
बाबा : सांगू नकोस...
राघव : खरंच ! इरा, आपण आईचा वाढदिवस साजरा करू.
इरावती : करणारच !
राघव : कधी तो ?

इरावती : पुढल्या महिन्यात...वीस तारखेला

बाबा : त्याला कळलं नाही!

राघव : (हसतो आणि–) मी दिल्लीला असणार.... पण एक दिवस लवकर येईन—

इरावती : बांदेकरांना रिटर्नची तारीख बरोबर दे...

बाबा : तू दिल्लीला जाशील, तेव्हा एक काम करशील का?

राघव : काय?

आई : (फुरंगटून) झालं!

बाबा : (चिडून) काय झालं?

आई : ('फा' वर ठसका देत–) तुमची आली ती शरदिनी 'फा' तर्फेकर....

बाबा : (चिडून) येऊ दे! (उठून त्याला सांगतात) मी तुला पत्ता देईन...करोल-बाग....तिला भेटायचं....आणि तिच्याकडून 'शरदिनी' ची एक कॉपी आणायची...सही करून दे, म्हणावं...तिला आनंद होईल....तिनं मला पूर्वी एक कॉपी दिली होती...वर लिहिलं होतं...विथ् लव्ह टु...व्ही. व्ही. इनाम-दार....शरदिनी फातर्फेकर....हरवली कुठं तरी...जागा बदलली, तेव्हा विशानं ती हरवलीयं....

राघव : तुमची मैत्रीण!

[बाबा एकदम दचकून आईकडे बघतात. ती त्यांच्याकडेच बघत आहे.]

बाबा : (एकदम हलक्या आवाजात) जरा आमचं ते गमतीचं होतं...आपलं.... (एकदम लाजून हसतात. त्याच क्षणी बाबुरावही सवयीने कारणाशिवाय हसतात. बाबा त्यांना वळून बघतात...आणि राघवला जरा बाजूला घेऊन...) अर्थात ती फार हुशार होती...पुढं फ्रेंच शिकली...फॉरेन सर्व्हिसमध्ये गेली...नुसतं तिला भेटायचं...

राघव : (गडबडीने...) ओके! नो प्रॉब्लेम! मी निघतो.... (आईला) आई वीस तारखेला धूमधाम...(आई कौतुकाने हसते.)

इरावती : त्या मंडळींना बोलावू....

आई : आधी कळवायला हवं...म्हणजे पाचगणीहून रंगा येईल...

राघव : निश्चित....

इरावती : तू स्कूटर काढ....मी आले...

राघव : आई....बाबा, गेलो...(जातो.)

बाबा : इरावती, तू मघाशी बांदेकर म्हणालीस, तो कोण?

इरावती : आमच्या कॉलेजात क्लार्क आहे...
बाबा : कृष्णाजी विनायक बांदेकरांपैकी कोणी नाही ना ?
इरावती : ( अडखळून ) हे कोण ?
बाबा : हे पूर्वी गव्हर्नराच्या बंगल्यावर ऑफिस सेक्रेटरी होते...बंगल्यावरची घड्याळं रिपेर करायला मी जात असे...गव्हर्नर रॉजर लंबले...
आई : ( दुरून दोन्ही हातांनी त्यांना थांबण्याची सूचना देत– ) ओक्के....ओक्के !
बाबा : (एकदम चिडून ) तुला मध्ये तोंड घालायची गरज नाहीए–
[ इरावती हसते. आई पदराखालून बिस्किटांचा पुडा काढून पुढे करते. ]
आई : ( इरावतीला ) चिडले, की त्यांना भूक लागते ! ( आपण हसते. )
इरावती : आई...बाबा, निघाले....( हसत निघून जाते. )
आई : दुसरी माणसं कामाची असतात...उगाच बडबड करून आपण त्यांचा वेळ घेऊ नये !
बाबा : ( चिडून ) मी घेणार !
आई : घ्या !
बाबा : बिस्किट दे....
आई : तो पाहील...
बाबा : त्याला ऐकू येत नाही...
आई : पाहील...
बाबुराव : मी जातो...
बाबा : कुठं ?
बाबुराव : गॅलरीत ....कावळ्यांना पाव घालतो...
बाबा : ( आश्चर्यानं ) कावळ्यांना ? का ?
बाबुराव : वेळ बरा जातो !
बाबा : कावळ्यांचा ?
बाबुराव : नाही ! माझा...

[ पिशवीतला पाव काढतात आणि गॅलरीत जातात. स्टुलावर बसतात. आणि पावाचे बारीक बारीक तुकडे हळूहळू फेकत राहतात. कावळ्यांची थोडी थोडी कावकाव ऐकू येते.
तेवढ्यात उघड्या दारातून विशा येतो. काखेत भिंतीवरचे घड्याळ आहे. ]

आई : विशा आला...( एकदम उठून उभी राहते आणि पाय ओढत त्याच्या जवळ जाते. )

बाबा : कोण ? (गॅलरीकडे जाऊन कावळ्यांना बघतात. )
आई : विशा आपला! शरदचा फोन आला होता ?
विशा : हो!
आई : बरा आहे ना ?
विशा : हो!
आई : आणि बानू ?
विशा : बरी आहे!
आई : मीना आली ?
विशा : काल आली... (चेष्टेने) लीलाची आणि रंग्याची चौकशी नाही केलीस ?
आई : (हसत) करणार आहे!...लीलाला म्हणावं, एकदा येऊन जा....
विशा : कशी आहेत ही माणसं ?
आई : फार चांगली आहेत...
विशा : आमच्यापेक्षा ? (ती लाडिकपणे त्याच्या गालावर चापटी मारते.)
आई : इथं एकच कमतरता आहे....या दोघांना मूल नाही!
विशा : इथं तुम्हांला मासळी मिळत नसेल ?
आई : कोणाला, रे, हवी आहे ? आता आम्हांला इच्छा आहे का ? जगण्यासाठी खाणं वेगळं... आणि मरणापूर्वी खाणं वेगळं! खाटीकखान्याकडे जाणाऱ्या गाईसुद्धा वाटेत काहीतरी खातातच ना ?

[ ती त्याच्याकडे बघते. तो नजर टाळतो. ]

विशा : बाबा तेच तेच बोलून राघवला वैताग आणीत असतील....
आई : (हसत) हे तेच तेच बोलतात. पण राघव वैतागत नाही... अरे, पुढल्या महिन्यात माझा वाढदिवस साजरा करणार....
विशा : वीस तारखेला ना ?
आई : (कौतुकाने) नशीब माझं!...त्या वेळी तुम्ही यायचं...ते बोलावणार तुम्हांला... मुद्दाम म्हणजे रंग्याला बोलव. त्याला बघावंसं झालंय् मला...आता माझा भरोसा नाही...
विशा : मुद्दाम जाऊन तिथं उभे राहिलेत....
आई : राहू दे....हे बघ...तू जेवून जा...जेवण तयार आहे....बटाट्याचा रस्सा आहे... ती करीत होती, तेव्हाच मला तुझी आठवण आली... जेवून जा ...
विशा : नको, ग. खाली टॅक्सी उभी आहे...
आई : (काकुळतीने) रश्शाबरोबर एक चपाती खा!

विशा : नको ! मी पळतो. मी घड्याळ द्यायला आलो होतो....
आई : ते झालं नीट ?
विशा : छे ! त्यातले पार्ट्सूच गेलेत....
आई : अरे, गेल्या वर्षी यांनी ते उघडलं. तर दोन दिवस कचऱ्यात काय काय मिळत होतं... असू दे ! करायचंय् काय ? मी तुला सरबत आणते (जाता जाता....) काही बोलले, तर उलट उत्तर देऊ नकोस ! तुझ्यावर म्हणून चिडतात... शरदला बरे घाबरून असतात... (बाईने पाय ओढत आत जाते.)
विशा : बाबा ... (बाबा वळून बघतात आणि जवळ येतात) बाबा, हे घड्याळ दुरुस्त होणार नाही – (तो घड्याळ उभे करून ठेवतो).
बाबा : कोण म्हणतो ?
विशा : मी ते खोलून पाहिलं...
बाबा : तुला काय कळतं त्यात ? तू पावसकरांना दाखव . पावसकर माझ्या हाताखाली तयार झालेला कारागीर आहे...
विशा : पावसकरसुद्धा, बाबा, तेच म्हणाले...
बाबा : काय म्हणाले ?
विशा : दुरुस्त होणार नाही !
बाबा : (चिडून) गांडीवर लाथ मार त्याच्या...दुरुस्त होणार नाही, म्हणतो, म्हणजे काय ?
विशा : त्यातले कित्येक पार्ट्स् नाहीसे झालेत....त्यात ग्रेट व्हील नाही... स्ट्रायकिंग ऑपरेटिंग व्हील नाही... लॅटर्न पिनियनच्या तारा नाहीत...
बाबा : कोण म्हणतो ?
विशा : (चिडून) मी म्हणतो... तुम्ही आईला विचारा.
बाबा : तिला काय त्यातलं कळतं ?
विशा : गेल्या वर्षी शहाणपणा करून ते तुम्ही खोललंत...तेव्हा किती चाकं खाली पडली....ती आई कचऱ्याबरोबर झाडत होती...
बाबा : हे बघ, विशा, मला सगळं माहीत आहे. मला दुधखुळा समजू नकोस ! तुमचा राग आहे माझ्यावर... तुला वाटतं, मी तुला शिक्षण दिलं नाही.... शरदला वाटतं, मी त्याला दुकान दिलं नाही ! काय दिलं नाही, ते तुम्ही मनात ठेवून आहात दंश करण्यासाठी ! पण काय दिलं, ते तुम्ही पाहत नाही ! कदाचित तुम्हांला हवं होतं, तेवढं मी देऊ शकलो नाही...पण पोटाला चिमटा घेऊन जेवढं देणं शक्य होतं, तेवढं मी दिलं. उद्या तुम्हांला द्यायचंय् ; म्हणून आज दाजींना दिलं नाही...त्यांचा जन्माचा वैरी झालो.... माझ्यावर

अविश्वास दाखवून त्यांनी आपल्या मर्तिकासाठी शंभर रुपये मागे ठेवले! (डोळे बाहीने पुसतात) आज आम्ही कुठं आहोत?

विशा : कुठं आहात? त्याला तुम्हीच जबाबदार आहात! लीला म्हणते, ते खोटं नाही-

बाबा : काय म्हणते?

विशा : तुझे आई-बाबा माझे कोण?

बाबा : (चिडून) तुझे आई बाबा राघवचे कोण? इरावतीचे कोण? सांग...

आई : (सरबताचा ग्लास घेऊन बाहेर येते) तुम्ही उगाच ओरडू नका...

बाबा : तू आहेस, तिथं उभी राहा...

आई : राहते! आयुष्यभर तेच केलं!

बाबा : शरद म्हणतो, मुलांसाठी काही केलं, तर ती इनव्हेस्टमेंट नव्हे...का? का नाही? दुकानाची इनव्हेस्टमेंट तुला हवी! पोट मारून त्याला शिकवलं, ती इनव्हेस्टमेंट त्याला हवी! आणि आम्ही गलितगात्र झाल्यावर मुलांकडे इनव्हेस्टमेंट म्हणून बघू नका, असं तुम्ही सांगणार? हरामखोर कृतघ्न आहात तुम्ही...कृतघ्न! (विशा एकदम जायला निघतो.)

आई : विशा—विशा—

[अशा त्याला हाका मारते. तो निघून जातो. काळोख होता होता—काव काव हा आवाज वाढत जातो....बाबुराव शांतपणे पावाचे तुकडे टाकत असतात.]

## प्रवेश दुसरा

[काही दिवसांनंतर. स्थळ तेच. संध्याकाळची वेळ. गॅलरीवर रंगीत बारीक दिव्याचे तोरण लोंबते आहे. गॅलरीच्या, खाली उघड्या जागेत बराच प्रकाश दिसतो आहे. तिथेच आईचा वाढदिवस साजरा होतो आहे. हॉलमध्ये लावून ठेवलेले दोन फुलांचे गुच्छ आहेत. फुलांची एक सुशोभित परडी आहे. या घटकेला हॉलमध्ये कोणी नाही. पण बाहेरच्या मोकळ्या जागेत गडबड चाललेली ऐकू येते. मुले आणि मोठी माणसे यांचा गोंगाट. मध्येच गोंगाट ओसरतो आणि मोठ्याने ओरडून घेतलेले काही संवाद ऐकू येतात– उदा., 'अरे रंग्या, इकडे ये– आजी बोलावतेय्....' किंवा 'बानू, आजीबरोबर फोटोला उभी राहा–']

इरावती : ( घाईघाईने आतून हॉलमध्ये येते–हाका मारते–) अहो, मीनाताई–( हाती ग्लासांचा ट्रे )
लीला : ( गॅलरीकडून येत ) मीना कशाला हवी ? पाहिलंत ना, कशी नटून आलीय् ती ? कुणालाही वाटेल, तिचाच वाढदिवस आहे–
इरावती : ( हसते ) ही ग्लासं मीनाताईकडे द्या. आणि त्यांत सरबत भरा, म्हणावं. ( ट्रे देते ).
लीला : सरबत बाहेर आहे का ? ( ग्लासे असलेला ट्रे घेते. )
इरावती : आणते मी....( घाईघाईने आत जाते. लीला ग्लासे घेऊन बाहेर जाते. )

[ बाबुराव बाहेरून घाईघाईने आत येतात. तेवढ्यात सरबताचा जग घेऊन इरावती आतून हॉलमध्ये येते. ]

बाबुराव : दे माझ्याकडे....
इरावती : तुम्ही जास्त धावपळ करू नका, बाबुराव ! ( ते वळता वळता ) अजून राघव आलेला नाही–
बाबुराव : ( ऐकण्याचा प्रयत्न करीत ) मला काही म्हणालीस ?
इरावती : ( मोठ्याने ओरडून ) मी म्हटलं, अजून राघव आला नाही.... काल यायचा होता...
बाबुराव : ( हसतात–) तो दिल्लीचा गुण ! तिथं मुक्काम वाढवावासा वाटतो– ( बाहेर जायला वळणार, तोच–) म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण म्हणतात, ते खोटं नाही– ( हसतात ).
इरावती : काय झालं ?
बाबुराव : तो विठ्ठलरावांच्या गळ्यात आहे, तो तुमचा कॅमेरा ना ? ( ती मानेने हो म्हणते–) तो त्यांच्याकडून काढून घे ! एक फोटो धड निघायचा नाही ! ते भोकातनं बघायच्या आधीच फ्लॅश मारताहेत–
इरावती : ( गमतीने हसत ) तुम्ही घ्या तो तुमच्याकडे–
बाबुराव : घ्या, म्हणजे काय ? देत नाहीत.... मी पंडित नेहरूंपासूनचे सर्वांचे फोटो काढलेत–

[ तेवढ्यात बाहेरून बाबा येताना दिसतात. ते संथपणे येत आहेत. त्यांनी पँट, पँटीत खोवलेला शर्ट, गळ्याला टाय् आणि डोकीवर उन्हासाठी घालतात, ती टोपी असा पोशाख केला आहे. व्यावसायिक फोटोग्राफरसारखा त्यांनी कॅमेरा गळ्यात घातला आहे. ते हॉलमध्ये येतात. ]

इरावती : बाबा, थोडे फोटो मी काढू का ?
बाबा : तुझ्याकडे दुसरा कॅमेरा आहे ?
इरावती : नाही, हा एकच आहे–
बाबा : मग नको ! मीच काढतो !
बाबुराव : विठ्ठलराव, माझ्याकडे द्या ! मी असे फर्स्टक्लास फोटो काढतो...

[त्यांच्या गळ्यातला कॅमेरा घ्यायचा प्रयत्न करतात. पण बाबा एखाद्या लहान मुलाप्रमाणे कॅमेऱ्याला हात लावू देत नाहीत–]

बाबा : (त्यांना आज्ञा दिल्याप्रमाणे–) तुम्ही तुमचं काम करा ! मुलांना सरबत द्या.... ग्लासं विसळून ठेवा ! आपापली कामं करा... (बाबुराव जायला वळतात, तेवढ्यात इरावतीला–) नंबर एकचा कामचुकार आहे ! (बाबुराव वळून बघतात)
इरावती : (हसत) ते ऐकतील, बाबा !
बाबा : त्यांना ऐकू येत नाही, ते एक बरं आहे !... आपण त्यांच्या देखत खरं मत देऊ शकतो ! (इरावती गमतीने हसते) आणि दुसरं काय, माहीत आहे ! याच्याकडे कॅमेरा दिला, तर सारखा रुक्मिणीच्या... तुझ्या आईच्या पुढं पुढं करणार.... फोटो काढण्याच्या निमित्तानं... तो असू दे स्वातंत्र्यसैनिक... पण स्ट्रेट माणूस दिसत नाही !.... माझी नजर आहे त्याच्यावर– (इरावतीला या म्हाताऱ्यांची खूपच गंमत वाटते आणि ती हसू लागते.) यातला रोल संपलाय्, इरावती !
इरावती : (आश्चर्याने) एवढ्यात, बाबा, रोल संपवला ?
बाबा : हल्लीचे रोल तसलेच, ग ! (कॅमेरा देत) पटापट संपतात–पूर्वीचे रोल म्हणजे (कॅमेरा घेऊन इरावती आत जाते. ती जाता जाता–) हा बाबुराव आला, तर त्याच्याकडे देऊ नकोस कॅमेरा—(ती आत जाते)
बाबुराव : (बाहेरून येत) अजून राघव आलेला नाही–
बाबा : (विनोद म्हणून कानावर हात घेत–) मला काही म्हणालात, बाबुराव ?
बाबुराव : हो ! (मोठ्याने) अजून राघव आला नाही–
बाबा : काल येतो म्हणाला होता–
बाबुराव : बहुधा त्याला तुमच्या शरदिनी फातर्फेकरनं ठेवून घेतला असणार–जेवायला !
बाबा : (खुशीने) मलाही तेच वाटतंय्–माझा मुलगा म्हणताच ती त्याला जेवायला, राहायला बोलावणारच !

[ तेवढ्यात इरावती कॅमेरा घेऊन येते आणि बाबांकडे देते. बाबा खुन्नसपणे बाबुरावांकडे बघत कॅमेरा गळ्यात घालतात. बाहेर जाऊ लागतात. ]

बाबुराव : ( जाता जाता ) मी काढू का फोटो ?
बाबा : ( मोठ्याने ओरडत— ) काही नको !

[ दोघे जातात. इरावती विमानतळावर फोन करते. तेवढ्यात बॅग घेऊन घाई-घाईने राघव येताना दिसतो. त्याच्या स्वागतासाठी बाहेर एकदम गलका उडाल्याचे ऐकू येते. ]

राघव : ( गॅलरीतून उत्साहाने हसत ) आलो .. आलो...आत्ता येतो...बसा...बसा...
इरावती : तुला एवढा उशीर का ? ( त्याची बॅग घेते ) आता मी एअरपोर्टवर फोन करीत होते.
राघव : ( कपाळाला हात लावीत ) अग, त्या शारदिनी फातर्फेकरचा पत्ताच सापडेना—
इरावती : फ्रेंडशिप कॉलनी, करोल बाग.
राघव : ( बसून बूट काढत ) त्या घराला कुलूप—
इरावती : मग ती भेटलीच नाही ?
राघव : ( दुःखाने ) अग, ती गेल्या महिन्यात वारली ! आय् ॲम सो सॉरी...
इरावती : ( दुःखाने ) अरेरे !
राघव : तिचा एक चुलतभाऊ मथुरा रोडला राहतो...तिथं गेलो...त्यानं ' शारदिनी ' पुस्तकाची एक कॉपी दिली. त्यावर तिची सहीसुद्धा सुदैवानं आहे. पण बाबांना काय सांगायचं ?
इरावती : ती गेली, ते सांगू नकोस ! कशाला उगाच त्यांना दुःख द्या ?
राघव : मलाही तेच वाटलं... म्हणून ते पुस्तक मिळताच त्यावर विथ् लव्ह् टु व्ही. व्ही. इनामदार असं मी लिहून टाकलं... इतक्या वर्षांनी काही बाबा तिचं अक्षर ओळखू शकणार नाहीत—— ( तेवढ्यात बाबा बाहेरून येतात )
बाबा : ( हसत ) भेटली का आमची शारदिनी ?
राघव : भेटली ! तिनं तुम्हांला पुस्तक दिलंय्....
बाबा : ( उत्साहाने ) बघू...बघू...( खूश होतात ).
राघव : मी विमानात पुस्तक चाळत होतो....फार सुंदर कविता आहेत तिच्या... ( बॅगेतले पुस्तक देतो. )
बाबा : ( आनंदाने ) करेक्ट ! हेच ते पुस्तक... ( उघडून बघत... आनंदाने हसत ) विथ् लव्ह्... टु... व्ही. व्ही. इनामदार.... तिचं अक्षर याही वयात होतं

तस्सं आहे.. काय, म्हणत होती काय ?

राघव : ( तो प्रश्न टाळण्यासाठी ) मी जरा बाहेर जाऊन सर्वांना भेटून येतो.

[ तो आणि इरावती बाहेर जातात. बाहेर मोठा गल्का होतो. तो गल्का विसरून बाबा पुस्तक घेऊन आरामखुर्चीत बसतात. पुस्तकाकडे....आतल्या 'विथ लव्ह टु' कडे बघत बसतात. एक-दोन वेळा त्यांना शरदिनीच्या आवाजात 'विथ लव्ह टु व्ही. व्ही. इनामदार' असे ऐकू येते.... पुसटसे. तेवढ्यात बाबुराव येतात. ]

बाबुराव : तुमची शरदिनी भेटली, म्हणे, राघवाला—

बाबा : भेटली ! ( आनंदाने ) तिनं हे पुस्तक भेट म्हणून पाठवलंय्....( पुस्तक देत ) वाचा.

बाबुराव : ( वाचतात ) 'विथ् लव्ह् टु व्ही व्ही इनामदार' ( बाबा समाधानाने हसतात )

बाबा : पाठीमागे बघा ! ( पाठीमागे तिचा फोटो आहे )

बाबुराव : ( फोटो बघत ) वा :! देखणी होती....

बाबा : होती नाही, आहे !

बाबुराव : शेवटपर्यन्त अनमॅरिड ?

[ बाबा मंद, गुत हसतात. बाबुराव पुस्तक परत देतात. देताना त्यांच्या गळ्यातला कॅमेरा काढतात. आपल्या गळ्यात घालतात. ]

बाबा : पुस्तक वाचताना एक फोटो काढा...( पुस्तक वाचण्याची फोटोसाठी पोज घेतात. फ्लॅश उडवून बाबांचा फोटो घेतात. ) ह्या फोटोच्या मला दोन कॉपीज् द्या !.... एक मला... एक तिला पाठवतो— शरदिनीला... ! ( ते पुस्तक चाळत बसतात. तेवढ्यात इरावती गडबडीने येते. )

इरावती : ( गॅलरीतून ) बाबा, तुम्ही तिथं काय करताय् ? आई इथं केक कापताहेत.... या लवकर ..

[ ते पुस्तक बाजूला ठेवतात. ती त्यांना धरून बाहेर घेऊन जाते. बाहेर जल्लोश. आईने केक कापला, म्हणून टाळ्यांचा आवाज. फोटो घेतल्याचे फ्लॅशीस. मग 'हॅपी बर्थ डे टु यू' हे सामुदायिक गाणे.

हॉलमधले दिवे मंदावतात. हळूहळू राघव, इरावती, बाबुराव आत येतात.

येताना भेट म्हणून आणलेली पाच–सहा पुडकी आणून टेबलावर ठेवतात. पाठोपाठ आई–बाबा येतात. आई वळून गॅलरीतून मुलांना, नातवंडांना निरोप देतात. ]

आई : रंग्या कधी जाणार पाचगणीला ?
रंगा : ( फक्त दुरून आवाज ) उद्या सकाळी जाणार, आजी !
आई : जपून राहा... आणि, बानू, तू परत कधी येशील ? ( स्वतःशीच ) बानूला या आजीचं फारसं नाहीचं !

[ बाहेरून ' येतो, आई ' ' येतो, आजी '... असे आवाज. आई आणि बाबा गॅलरीतून टाऽटा करतात. ' टाऽटा ' करीत मंडळी गेल्याचा आवाज. ]

आई : ( दचकून मागे वळत ) गेले का ते ?
बाबा : ( तिला ओढून ) राहिलं काय ?
आई : रस्ता ओलांडताना डावीकडे बघा, म्हणून सांगायला विसरले....
बाबा : ती काही कुक्कुली बाळं नाहीत...शाळेत जाणारी ! चल तू—

[ बाहेरचे दिवे जातात. तेवढ्यात बाबुराव सराईत फोटोग्राफरसारखे फोटो काढण्यासाठी पुढे येतात. ]

बाबुराव : वन् मिनिट, प्लीज—
आई : आता काय राहिलं बाबुरावांचं ?
बाबुराव : तुमचं एक शेवटचं पिक्चर काढून घेतो... एकच शेवटची फिल्म शिल्लक आहे—

[ आई–बाबा एकमेकांना चिकटून फोटोसाठी उभे राहतात. बाबुराव कॅमेऱ्यातून बघतात. बाबुराव पुढे येतात आणि आईच्या हनुवटीला हात लावून तिचा चेहरा तिरपा करतात. तेवढ्यात बाबा बाबुरावांच्या मनगटावर चापटी मारून हात काढायला लावतात. बाबुराव सॉरी म्हणत फोटो काढतात. ]

बाबा : बघितलंस ना ? म्हातारा पक्का आहे ! तुझ्या गालाला हात लावीत होता—
बाबुराव : ( किंचित चिडून ) मी गालाला हात लावीत नव्हतो.
आई : ( दचकून ) त्यांना ऐकून आलं वाटतं !

बाबुराव : मला चांगलं ऐकू येतं—

[ आई आणि बाबा एकदम भूत दिसावं, तसे चमकतात. ]

बाबा : काय ? तुम्हांला ऐकू येतं ?
बाबुराव : उत्तम ! ( आई खुदुखुदु हसते ).
बाबा : ( हाका मारीत ) राघव.... इरावती...( ते बाहेर येतात ) अग, या बाबुरावांना चांगलं ऐकू येतं.... इतके दिवस त्यांनी बहिरेपणाचं सोंग घेतलं होतं—
राघव : होय, बाबुराव ?
बाबुराव : होय ! मला चांगलं ऐकू येतं, राघव !
राघव : मग, बाबुराव, का म्हणून तुम्ही आम्हांला फसवलंत ?
बाबुराव : फसवलं नाही, बनवलं ! ( हसतात. )
इरावती : पण का, बाबुराव ?
बाबुराव : एक गंमत, ग —
इरावती : पण यात गंमत कसली ?
बाबुराव : जे तुम्ही माझ्या मागे बोलला असता, ते समोर बोललात.
राघव : तुम्ही ते सगळं ऐकत होता ?
बाबुराव : ( हसत ) सगळं ! मूर्ख... क्रॅकपॉट... जेवायला आलेत... रखमाबाईकडे टक लावून बघतो.... सगळं ! ( हसतात. सर्वजण मोठ्याने हसतात ) येतो मी, उशीर झाला ! ( नमस्कार करतात )
राघव : उद्या ?
बाबुराव : येणार ! ( काहीसे गंभीर ) नाही तर जाणार कुठं ?
राघव : पण ऐकू ?
बाबुराव : येणार ! ( वाईट वाटते ) ऐकू येतं, म्हणून चुकून बोलून गेलो...एका गमतीला कायमचा मुकलो... ( जातात ).
बाबा : ( राघवला ) शरदिनी काय म्हणाली ?
राघव : बाबा, आपण उद्या बोलू.... मी झोपतो आता—
आई : इरावती, तुझी पापलेटची आमटी फार रुचकर झाली होती ... खरंच—
इरावती : मी मुद्दाम तुमच्यासाठी शिकतेय् आता... फिशच्या प्रिपरेशन्स !
राघव : बाबुरावांनी एक मोठी गंमत घालवली– चला ! आई, बाबा, आता तुम्ही झोपा !
आई : थोडा वेळ इथंच बसतो. आज मला लवकर झोप येणार नाही ! आनंदाच्या भरात आज माझं विमान फार फार वर जातंय्–

बाबा : तिच्या आयुष्यातला हा फार मोठ्या आनंदाचा क्षण... इरावती !
इरावती : आम्हांलाही खूप आनंद वाटला...सर्व माणसं जमली...आपलेपणानं ! आम्ही झोपतो...
आई : जरा एक मिनिट या...( राघव–इरावती पुढे येतात. त्यांचे चेहरे दोन हातांत धरून ती त्यांच्या कपाळाचे चुंबन घेते.) जा झोपा !

[ राघव व इरावती जातात. ]

बाबा : प्रेझेण्ट्स् काय आली, ती बघू या का ?
आई : आता नको ! उद्या राघव...इरावती यांच्यासमोर बघू या....
बाबा : ( थांबून ) मला तुझं एक आवडलं नाही...
आई : काय ? बाबुरावांनी माझ्या हनुवटीला हात लावला, ते ? ( हसते )
बाबा : ते नाही ! ( वेगळ्या आवाजात ) पण हा म्हातारा बाबुराव फारच तुझ्या पुढं पुढं करतो !...आणि आता उद्यापासनं तुला ते सांगण्याचीही मोकळीक नाही !...त्याला ऐकू येत नव्हतं, तेव्हा सांगता तरी येत होतं... ( ती हसते. )
आई : पण आवडलं काय नाही ?
बाबा : तू हातांतल्या बांगड्या काढून एक एक लीलाला आणि मीनाला दिल्यास, ते....
आई : आता काय करायच्यात मला ? नुसतं ओझं ! गळ्यातली माळ आणि मंगळ-सूत्र इरावतीला देणार...मीना बघत होती, मी माळ काढते का गळ्यातली...
बाबा : त्यांना काहीही द्यायला नको होतं....
आई : शेवटी नाती ती ! तोडून तुटतील का ? धाकटा मला आज किती आग्रह करीत होता...
बाबा : कोण ?
आई : शरद....तुमचा मिनिट काटा– राहायला बोलावीत होता...
बाबा : त्याला माहीत....तू येणार नाहीस....
आई : असू दे ! तोंड पसरून बोलावलं तरी...
बाबा : माझ्याकडे सुद्धा अगदी गोड गोड बोलत होता....म्हटलं, इतकं गोड बोलू नकोस....जिभेला मुंग्या येतील !– तसा बाजूला गेला ..
आई : ( चिडून ) असल्या तुमच्या तोंडामुळं तुम्हांला कोणी बोलावीत नाही...
बाबा : नको. बोलावू दे ! शेवटी भेटलाच ना कोणी तरी बोलावणारा ? ना नात्याचा... ना रक्ताचा किती आनंदात ठेवलंय् त्यानं ! आपण इथं नकोसे आहोत, अडगळीत पडलोत, असं इथं वाटत नाही !...राघवनं तर आज मला चार–

पाच टेलिफोन नंबर दिलेत....वेळ जात नसला, तर त्या नंबरांवर फोन फिरवून बोला म्हणाला . म्हाताऱ्यांचा काही उपयोग नसला, तरी त्यांना किंमत आहे, असं वाटलं पाहिजे .. ( खिशात काहीतरी शोधू लागतात )

आई : काय शोधताय् ?

बाबा : ते टेलिफोन नंबर कुठे ठेवले ?

आई : आता फोन करताय् ?...आता रात्र झाली ...

बाबा : ( शोधता शोधता....) राघवनं माझ्यासाठी लॉटरीची तिकिटं आणलीत...( ती तिकिटे पाहून त्यांना आनंद होतो. )

आई : ( एकदम हसते ) एक विचारायलाच विसरले...

बाबा : काय ?

आई : राघवला दिल्लीत तुमची ती बया...भेटली, की नाही ? शरदिनी फातर्फेकर... काय मेलीचं नाव !

बाबा : ( चिडून ) तू बघ, उगाच जळू नकोस तिच्या नावानं...

आई : मी नाही जळत ! पण म्हणाली काय ?

बाबा : ते तो मला उद्या सांगणार आहे...

आई : ऐका ! ( ते उठतात आणि हॉलमध्ये 'शरदिनी' पुस्तक शोधू लागतात ) काय शोधताय् ?

बाबा : तिनं दिलेलं पुस्तक मी कुठं ठेवलं ?

आई : मिळेल ! उद्या बघा...आधी इथं या— ( ते येतात ) पारिजातकाच्या झाडा· खाली विशा तुम्हांला काय सांगत होता ?

बाबा : कधी ?

आई : मी केक कापल्यावर ?

बाबा : हां...हां ! सांगत होता...बाबा, मला शरम वाटते...तुम्ही हक्कानं माझ्याकडे राहा...हे घर तुमचं आहे, असं मी तोंड उघडून म्हणू शकलो नाही !

आई : ( आनंदाने ) असं विशा म्हणाला ? की तुम्ही काही पदरचं सांगताय् ?

बाबा : नाही, ग, तसंच तो म्हणाला.

आई : तुम्ही काय सांगितलंत ?

बाबा : मी म्हणालो, बाबा रे, तू जिवाला त्रास करून घेऊ नकोस ! दिवस उलटे आहेत...सुखाच्या, स्वातंत्र्याच्या कल्पना बदलल्या आहेत...ज्यांचा उपयोग नाही...त्यांना किंमत नाही ! साधी गोष्ट !

आई : विशा रडला असेल...( एकदम पदराने डोळे पुसते. ) आज मी कधी नव्हते इतकी सुखात आहे हवेत तरंगतेय् मी ! ( एकदम आरामखुर्चीत पाठीमागे लवंडते ) एक करता का ?

बाबा : काय ?
आई : या पोरांवर मी गीतं केली होती...ऐकायची इच्छा आहे...आणता ?
बाबा : थांब, आणतो...( उठून आत जातात. )
आई . ( बाबा जवळ आहेत, असे समजून ) ऐकलंत का ? मी भ्याले....ओरडले, तर ओरडून कुणाला उठवू नका ! छाती धडधडतेय्...विशा आलाय् का ?
बाबा : ( कागद घेऊन बाहेर येत ) वाचू ?
आई : वाचा...( आवाज विरलेला ) मला खोल खोल झोप येतेय्....
बाबा : ( घाबरून ) रुक्मिणी, तुला बरं वाटत नाहीए का ? डॉक्टरांना बोलावू ?
आई : नको ! मी सुखात आहे ! वाचा...वाचा तुम्ही लवकर.
बाबा : ( कागद डोळ्यांसमोर धरून ) ‘ आनंदाचा दिवस उदेला । प्यारा विश्वनाथ झाला ॥ आज कुळाचा दीप उजळला । देवा, सुखी ठेव त्याला ॥
आई : शरदचं...
बाबा : ( कान जवळ करून ) शरदचं गीत ?
आई : नाही ! शरदचं नाव...शरदिनीवरून ठेवलं ?
बाबा : छे ! हे कधी माझ्या लक्षातसुद्धा आलं नाही ! ( एकदम खोकते ) तुला त्रास होतोय् का ? रुक्मिणी...
आई : मला माझा बाळकृष्ण देता ? पूजेतला ?
बाबा : तो कशाला ?
आई : जा लवकर...मला भीती वाटतेय्–( ते आत जातात– तेवढ्यात सूक्ष्मसा मुरलीचा आवाज ऐकू येतो. ) तुम्हांला मुरलीचा आवाज ऐकू येतोय् ? तो वाजवतोय् पायावर आडवा पाय घेऊन...पाहिलंत ? ( बाबा येतात. तिने हाताचा तळवा उघडलेला आहे. त्यात चांदीचा बाळकृष्ण ठेवतात. ती घट्ट मूठ आवळते.) मला भीती वाटतेय्....माझा हात घट्ट धरा....सोडू नका....मी दूर–दूर....

[ तिचे बोलणे तुटते. त्याच क्षणी कुत्र्याचे रडल्यासारखे हेल ऐकू येतात.]

बाबा : ( गडबडून ) रुक्मिणी....रुक्मिणी....( तिला गदागदा हालवतात....)रुक्मिणी– विशा...राघवा...इरावती...

[ हाका चालू असतानाच अंधार होतो...आणि शोकसंगीत. ]

## प्रवेश तिसरा

[तेच स्थळ. काही दिवसांनंतर. वेळ रात्री आठ वाजताची. बाबा एका छोट्या बैठकीवर बसले आहेत. समोर एक छोटे स्टूल आहे. स्टुलावर त्यांनी भिंतीवरचे घड्याळ खोलून ठेवले आहे. एका हातात स्क्रू-ड्रायव्हर आहे. डाव्या डोळ्याला लुकिंग ग्लास लावून ते घड्याळाची यंत्रे पाहत आहेत. क्षण, दोन क्षण जातात. तेवढ्यात फोन वाजतो. आतून राघव येतो. फोनकडे जाताजाता... ]

राघव : होतंय् का, बाबा, घड्याळ ?

बाबा : न व्हायला काय झालंय् ? रायकरांच्या हाताखाली शिकलोय्! विशा रिपेर होणार नाही, म्हणतो, मी त्याला करून दाखवतो... मग थोबाडीत बसल्यासारखं तोंड करील...

राघव : ( फोनवर ) हॅलो...! कोण ? हां...हां....बाबाशी बोलणार ? थांब हं ! ( फोनवर हात धरून ) बाबा, तुमचा फोन....

बाबा : ( डोळ्याला लावलेले भिंग काढीत ) कुणाचा ? विशाचा ?

राघव : नाही. तुमची तरुण मैत्रीण... ( हसतो )

बाबा : ( उठत...आनंदाने ) शरदिनी ?

राघव : ( एकदम गंभीर होतो...मानेने 'नाही' म्हणत .. ) दर दोन दिवसांनी तुम्हांला फोन करते, ती ! ( त्यांच्या काही लक्षात येत नाही.... बघत राहतात ) बाबा, हल्ली तुमच्या काही म्हणजे का ऽऽ ही लक्षात राहत नाही !

बाबा : कोण ?

राघव : नलिनी शाळिग्राम....

बाबा : ( हसत....फोन घेतात ) नलिनीबाई का ? ( फोनवर.... ) हॅलो ! काय, ग ! तुझा पत्ता काय ...? खोटं बोलू नकोस... मुस्काटात देईन ! पंधरा दिवस झाले....तुझा फोन नाहीये ! परवादिवशी केला होतास... ? नॉन्सेन्स ! मला आठवत नाही, असं होणार नाही...कधी ? गुरुवारी ? अग, मला म्हाताऱ्याला आता सिनेमा काय करायचाय् ? तसा म्हातारा नाही, ग....सिनेमा पाहून जेवायला ? तुझी मोटर आहे, म्हणा...पण तुझा नवरा येणार का बरोबर ? मग मी येणार नाही ! तो एखाद्या विसरभोळ्या म्हाताऱ्यासारखा आपलंच काहीतरी सांगत बसतो...आणि आमच्या दोघांत हा तिसरा कशाला ? ( ते ऐकून राघव खदखदा हसतो ) तू मला खोताच्या वाडीतल्या अनंताश्रमात

नेशील का जेवायला ? मला तिथं मसाल्याच्या तिसऱ्या खायच्यात... पूर्वी मी फोर्टमधून टॅक्सीनं येऊन अनंताश्रमात जेवून जात असे!...विशाला आणि शरदला दोनदा म्हटलं, मसाल्याच्या तिसऱ्या खाव्याशा झाल्यात...पण कुणी वाटीभर घेऊन आला नाही! नको आणू दे!...तुला आज वेळ असला, तर ये ना....कुठं ? दिल्लीला जाते आहेस ? नवऱ्याबरोबर ? तिथं (राघव गडबडतो) शरदिनी फातर्फेकरला भेटायचं...(फोन बाजूला करीत....) राघव—

राघव : (गडबडून थाप मारतो) ती महिनाभर कलकत्त्याला जाणार होती...

बाबा : शरदिनी ? (तो मानेने 'हो' म्हणतो. फोनवर...) नाही, ग! शरदिनी कलकत्त्याला गेलीय्....पुढच्या वेळी! ओ. के. मी गुरुवारी तयारीत राहतो. पण तुझा नवरा बरोबर नाय पायजे! थँक्यू... (हसत हसत फोन ठेवतात.)

राघव : बाबा, तुम्हांला तिसऱ्या खाव्याशा झाल्यात, तर इरावतीला नाही का सांगायचं ?

बाबा : अरे, तिला तिसऱ्या जमायच्या नाहीत...एक एक शिंपला विळीवर उघडायचा, एक शिंपी टाकायची...दुसरी ठेवायची...ठेवलेल्या शिपीत मांस ठेवायचं... कटकटीचं काम आहे ते....

राघव : करील बाबा, ती....

बाबा : नको, रे! जेनूं काम तेनूं थाय, भटजी करोसे गोते खाय! (दोघेही हसतात)— तू कपडे करून कुठं निघालास ?

राघव : मी प्रोफेसर साळुंकेकडे जेवायला जातोय्...लवकर येणार...

बाबा : इरावती सुद्धा...

राघव : नाही! एकटाच जातोय्...

बाबा : का ?

राघव : मला एकट्यालाच आमंत्रण आहे...

बाबा : (मध्येच एकदम) शरदिनी कलकत्त्याला जाणार होती, ते मला नाही सांगितलंस ?

राघव : (गडबडतो) विसरलो!

बाबा : कलकत्त्याला कुणाकडे ?

राघव : कल्पना नाही! (विषय बदलण्यासाठी) घड्याळ झालं का रिपेर ?

बाबा : (एकदम चिडतात) त्या विशाला इथं येऊ दे! एक थोबाडीत देतो त्याच्या!

राघव : काय झालं ?

बाबा : चोरानं या घड्याळातली सगळी चाकं विकून खाल्लीत! (घड्याळ बंद करून) तू हे भिंतीवर लावून ठेव! नाहीतर तो याची केस विकून सुद्धा हजार पाचशे खिशात घालील....असल्या जुन्या घड्याळांना मागणी असते....

[ तो ते घडयाळ स्टुलावर चढून भिंतीवर लावून ठेवतो. ते थकलेल्या चालीने आरामखुर्चीवर बसतात. ]

राघव : जेवायला जात नाही ?

बाबा : जरा बसतो ! रुक्मिणी गेल्यापासून मला अधिक थकवा वाटतोय्...नर्व्हसनेस् आलाय्...

[ मान पुढे लोंबते आणि डोळे मिटतात. राघव, खोलीच्या दरवाज्यातून 'इरा, मी जाऊन येतो, बाबांवर लक्ष ठेव' असे सांगतो आणि जातो. जाण्यासाठी दरवाजा उघडतो. दारात विशा उभा. ]

राघव : ( विशाबरोबर येत ) ये...आत्ताच मी बाहेर निघालो होतो

विशा : जा, ना तू ! मी बसतो थोडा वेळ आणि जातो.

राघव : जेवून जा...बाबाही आता जेवायला उठतील.

विशा : छे ! मला गेलं पाहिजे !

[ ते दोघे तिथेच बसतात. समोर बाबा आरामखुर्चीत डुलकी घेत झोपले आहेत. ]

राघव : गेल्या आठवडयात शरद् आला होता.

विशा : त्याचाच फोन आला होता...

राघव : काय ?

विशा : बाबांची कंडिशन तेवढीशी बरी नाही, म्हणून...तुम्हांला त्रास होण्याची शक्यता...भ्रमिष्टासारखे करतात.... तेच तेच बडबडतात...

राघव : दॅटस् ओल्ड एज ! यू काण्ट हेल्प इट्... ! बाय् द वे ही शरदिनी फातर्फेकर कोण ?

विशा : मला शरद् म्हणाला, बाबा तिची वारंवार आठवण काढतात, म्हणून ! पण इतक्या वर्षात आम्ही तिचं नावसुद्धा कधी ऐकलं नाही ! ती गेली, हे कळलं त्यांना ?

राघव : नाही ! पण मला गंमत वाटते...मनात खोल दडपलेली एखादी आठवण अशी वर येत असावी...

विशा : मी म्हणत होतो, वाटल्यास पैसे भरून चांगल्याशा वृद्धाश्रमात ठेवू....

राघव : छे...छे ! या स्थितीत...विशेषतः आई गेल्यानंतर त्यांना खरी गरज आहे.

ती मायेची...ओलाव्याची!

विशा : पण तुला त्रास नाही होत?

राघव : मुळीच नाही! मी त्यांच्यांत माझं म्हातारपण पाहतो... हे असे डुलकी घेत झोपलेत ना?...तर त्यांच्यांकडे बघताना मला माझंच ऐंशीव्या वर्षातलं प्रतिबिंब मी पाहतोय्, असं वाटत राहतं....आणि माझ्या मनात वेगळीच करुणा निर्माण होते...ते माझे बाबा आहेत...तुझे खरे बाबा, माझे मानलेले... पण ती रेषा आता पुसट झालीय्... बाबा म्हणूनच नव्हे, एक माणूस म्हणून त्यांची आबाळ होता नये, अवहेलना होता नये, असं मला वाटतं....त्यांनी आमच्या मनासारखं वागायला हवं, अशी आपण अपेक्षा करतो, ते चूक आहे....ते आपल्या मनाप्रमाणेच वागणार... आपण लहानांनी जुळवून घेतलं पाहिजे...

विशा : राघव, हे कसं शक्य आहे? आम्हांला आमचं म्हणून काही आयुष्य आहे..

राघव : ते जुळवून घेता येतं! आता खरं तर आम्हां दोघांनाही बाहेर जेवणाचं आमंत्रण आहे...पण बाबांसाठी इरावती घरी राहणार आहे...

विशा : पण हे का करावं? विशेषतः वृद्धाश्रमाची सोय असताना?

राघव : अगदी साधी गोष्ट आहे, विश्वनाथ! आमच्या म्हातारपणीही आम्ही असेच वागणार...त्या वेळी आमची अपेक्षा असणार...आमच्या मुलांनी आमच्याशी जुळवून घ्यावं... आम्हांला आपल्या घरी चांगलं वागवावं...

[ दोघेही क्षणभर डुलक्या घेणाऱ्या बाबांकडे बघतात. तेवढ्यात आतून इरावती येते. ].

इरावती ; (विशाला—) तुम्ही आलाय्त? म्हटलं, कोण बोलतंय् बाहेर? तुम्ही आता जेवून चला...बाबाही आत्ता जेवायला बसतील—

विशा : छे, हो! मला ताबडतोब निघालं पाहिजे.... लीलाचा भाऊ जेवायला येणार आहे!

इरावती : नाहीतर, बाबांसाठी खास आज रावसाची आमटी आहे—

विशा : तुम्ही केली?

इरावती : नाही....इथं समोर देविदास कामत राहतात. त्यांनी पाठवलीय्.

विशा : कामत?

राघव : काही लोकांना मी सोशल वर्कसाठी उद्युक्त केलंय्...ते अधनंमधनं एक—दोन तास येतात....गप्पा करतात....त्यामुळं बाबांचा वेळ आनंदात जातो... विशेष म्हणजे आपण निग्लेक्टेड् आहोत, असं त्यांना वाटत नाही! ही इज व्हेरी हॅपी—

इरावती : ( बाबांना हळूच हालवते ) बाबा...बाबा–

[ बाबा एकदम दचकून डोळे उघडतात. सर्वांच्या तोंडांकडे बघतात. त्यांना क्षणभर कुणाचीच ओळख पटत नाही! ते मान उचलून शेजारी उभी असलेल्या इरावतीकडे पाहतात. ती रुक्मिणी आहे, असा त्यांना भास होतो. ]

बाबा : कोण....रुक्मिणी ?
इरावती : ( त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत ) मी इरावती, बाबा!
बाबा : इरावती! तू जेवलीस ?
इरावती : चला...तुमच्याबरोबर मी जेवणार...चला–
बाबा : कुठं ?
इरावती : जेवायला....राबसाची आमटी आहे ..
बाबा : मी मघाशी जेवलो ना!
इरावती : ( हसते ) कधी ? ( विशाला आणि राघवला ) हल्ली असं सगळं विसरतात. आणि कुठलं...जुनं.. पन्नास वर्षांपूर्वीचं आठवतं...( त्यांना हाताला धरून आत घेऊन जाते...)
राघव : येत्या गुरुवारी नलिनी शाळिग्रामबरोबर....डॉक्टर शाळिग्रामची बायको– सिनेमाला जाणार आहेत...ती आठवड्यातून एकदा त्यांना मोटारीनं फिरवून आणते. ती म्हणाली, सिनेमा पाहिल्यावर जेवायला जाऊ! तर हे म्हणाले, खोताच्या वाडीतल्या अनंताश्रमात ने...मसाल्याच्या तिसऱ्या खायच्यात–
विशा : ओ....माय् गॉड! (चुटपुटतो ).
राघव : काय झालं ?
विशा : पंधरा दिवसांपूर्वी म्हणाले होते...मसाल्याच्या तिसऱ्या खाव्याशा वाटताहेत म्हणून! लक्षातच राहिलं नाही!...आणि काय आहे, माहीत आहे ? तिसऱ्या आणल्या, तर त्या नीट करायची एवढी कटकट असते, की लीला दिवसभर आदळआपट करणार ?
राघव : विश्वनाथ, मी निघू का ?
विशा : तू नीघ, राघव! मी पाच मिनिटं बसतो आणि जातो.
राघव : ( जाता जाता ) तू आत बैस ना, बाबांबरोबर– ( जातो. )

[ तो आत जाता जाता बाबा बाहेर येतात. त्यांच्या पाठीमागून इरावती. ]

इरावती : अजिबात जेवले नाहीत! ताटाला हातसुद्धा लावला नाही!

विशा : बाबा, जेवला का नाही ?

बाबा : ( त्यांना अजून विशाची ओळख पटलेली नाही....रोखून बघत ) जेवलो.... मघाशीच जेवलो....ही...ही पुनः पुनः जेवायला लावते. पोटाला तडस लागलीय्... ( शान्तपणे फेऱ्या मारतात. )

इरावती : ( विशाला ) तुम्ही पाच मिनिटं इथं बसणार का ?

विशा : हो... का ?

इरावती : मी झटकन जाऊन समोरून पाव घेऊन येते...रात्री बाबांना भूक लागली, तर दुधाबरोबर टोस्ट करून देईन.

विशा : आहे मी थोडा वेळ....

[ ती घाईघाईने बाहेर जाते. ]

बाबा : ( फेरी मारता मारता मध्येच विशाला रोखून बघत ) कोण ?

विशा : मी विशा...

बाबा : तू कधी आलास ?

विशा : मघाशीच आलो....

बाबा : मग मला कसं कळलं नाही ?

विशा : तुम्ही झोपला होता ?

बाबा : ( एकदम चिडून ) चल ! काहीतरी खोटं सांगू नकोस... झोपेन कसा ? तुझी आई गेल्यापासून मला झोपच नाही ! रात्र रात्र मी जागा असतो.... ट्रंक उघडून बसतो...जुनी पत्रं वाचतो...तुमच्या कुंडल्या ... तुमची प्रगतिपुस्तकं...

विशा : ( हतबल होऊन शरण येत– ) ठीक आहे !

बाबा : विशा, तू पॉकेट वॉश आणलंस ?

विशा : ( घाबरून ) नाही !

बाबा : ( चिडून ) का नाही ? हे ( भिंतीवरचं ) आप्पाचं घड्याळ....पाडलोसच्या घरातलं घड्याळ ... त्याची चाकं विकून खाल्लीस...

विशा : ( दुखावतो ) बाबा ...

बाबा : हे दाजींचं पॉकेटवॉचही तू विकलं आहेस...अरे, ते कुठल्याही घड्याळासारखं घड्याळ नव्हे.. दाजींनी जाकिटासकट विहिरीत जीव दिला...आठ तासांनी दाजींची बॉडी वर काढली...तर हे घड्याळ त्यांच्या खिशात टिक् टिक् चालू होतं.... ( एकदम त्यांचा आवाज गद्गदतो. ते डोळ्यांवरून बोट ओढतात. ) ते घड्याळ तुला विकायला दिलं नव्हतं...अरे, दाजींच्या स्पर्शाचा लळा तुला लागावा....त्यांची आठवण तुला यावी... त्यांचं नाव तुला ठेवलंय्...माणसं

मरतात....संपतात...पण नात्यातला ओलावा संपत नाही...आठवणी नष्ट होत नाहीत... ( खोकतात....थकतात ) अरे, आई तुझी पडली...तिचा पाय मोडला, तर तिला उचलून चॅरिटी होममध्ये टाकता ?

विशा : ती शरदची कल्पना ...

बाबा : ( चिडून ) पण तू नको म्हणाला नाहीस... जिथं जिवंत आणि मेलेले सांगाडे ठेवले होते, अशा गुदामात तुम्ही आम्हांला ठेवलंत.... तुझी आई रात्रभर रडत होती... तिला चालता येत नाही, म्हणून एक पोरगा तिला कुबड्या देऊन गेला...कुठला कोण ? आणि तुम्हां, आमचा उपयोग नाही, म्हणून घराबाहेर काढता ? गिरगावातल्या चाळीतल्या दोन खोल्या विकून तू नवीन ब्लॉक तुझ्या नावावर घेतलास...आम्हांला सहज घराबाहेर काढता यावं, म्हणून ?...अरे, तिसऱ्या खाव्याशा वाटल्या—

विशा : ( दुखावून ) मी आणणार आहे, बाबा !

बाबा : नको ! काही नको ! तुम्ही कोणी तोंड दाखवू नका मला— मला माहीत आहे...मी तुमचा बाप असलो, तरी बाबा नाही ! तू इथनं चालायला लाग... ( विशा दहाची नोट काढतो व ती देऊ करतो— ) हे काय ?

विशा : पैसे आहेत खर्चाला...

बाबा : ( तोडून ) गरज नाही ! गरज होती, तेव्हा कधी दिले नाहीस...तुला हवे असले, तर त्या कोटाच्या खिशात हात घाल...जाहिरातीसाठी घेतलेले घेऊन जा...इरावती माझी नेहमी त्या खिशात काही ना काही ठेवीत असते....मी नको म्हणतो. आता मला कसला खर्च आहे ? तरी ती ठेवते... म्हणते, खिशात चार पैसे असले, म्हणजे माणसाला सुरक्षित वाटतं ! आणि तुम्ही दोघांनी...

विशा : ( वैतागून .. पण दुःखाने ) त्रास करून घेऊ नका ! मी जातो !

बाबा : ( कडाडून ) जा...ताबडतोब निघून जा ! ( तो जायला निघतो. तेवढ्यात...) आणि जाण्यापूर्वी एक लक्षात ठेव... मी मेल्यावर माझं गाडगं तू किंवा शरदनं घ्यायचं नाही ! ते राघव घेईल !...चालायला लाग....

[ तो जायला वळतो, तेवढ्यात त्याला आठवण होते. त्याने पिशवीतून चार बटाटावड्यांची पुडी आणली आहे. ती पुडी तो समोर धरतो. ]

बाबा : हे काय ?

विशा : मंजूकडचे बटाटेवडे... तुम्हांला आवडतात, म्हणून...

बाबा : ( रागाने पुडी भिरकावतात ) काही नको ! चालायला लाग !

[ तो दुःखभराने खाली मान घालतो आणि जाऊ लागतो, तेवढ्यात बाबा आरामखुर्चीत थकून बसतात. ओरडून त्यांना खूपच थकवा आला आहे. डोके मानेतून तुटल्यासारखे छातीवर लोंबते आहे. डोळे मिटले आहेत. विशा गॅलरीकडल्या दरवाज्याकडून वळून बघतो. बाबांची ती करुणाजनक स्थिती पाहून हेलावतो. मागे वळतो. वड्यांची फेकलेली पुडी उचलतो. क्षण, दोन क्षण बाबांना पाहत उभा राहतो. दुसऱ्या क्षणी चटकन् गुडघे टेकतो आणि बाबांच्या गुडघ्यावर डोके ठेवतो. ]

बाबा : ( दचकून जागे होत.... ) कोण ?

विशा : मी विशा ! बाबा, असे रागावू नका ! तुमच्याबद्दल मला प्रेम वाटत नाही, असं नाही... पण कुणाचं काय चुकतं, तेच कळत नाही ! राघव करतो, तेवढं आम्हांला का जमत नाही ?

बाबा : ( त्याच्या कपाळावरून मायेने हात फिरवतात ) तुला मी काही टाकून, रागावून बोललो का ? विशा, ते मनाला लावून घेऊ नकोस...तुझी आई नेहमी म्हणायची.... तुला आठवतं,की नाही , कोण जाणे....म्हणायची...आम्ही काही केलेलं तुम्हां मुलांना आवडलं नसलं, तरी ते तुमच्या भल्यासाठीच होतं, या श्रद्धेनं केलं...! माझ्या मनात तुमच्याबद्दल राग नाही ! आमची मनं तुमच्या ...मुलांच्या रंगांनी रंगलेली असतात...चॅरिटी होममध्ये तुझी आई जेवली नाही.. पण ताटातली तळलेली कोलंबी कागदात बांधून घेऊन आली... शरदला आवडते, म्हणून ! अशी मनं असतात आमची. आता आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर असताना कुणाबद्दल माझ्या मनात वाकडेपणा नाही ! मी मेल्यावर तुला.... शरदला... माझ्या सुनांना . नातवंडांना कधी तरी... कोणत्या तरी कारणानं माझी आठवण यावी....कधीतरी गळ्याशी गहिवर दाटावा, एवढीच इच्छा आहे ! तेवढंच तुम्ही केलेलं आमचं स्मारक !

[ त्यांचा आवाज खरखरीत होतो. विशाचा गळा दाटून येतो. तो डोळ्यावर बोट ओढतो. ]

विशा : ( दाटलेल्या आवाजात ) एक वडा खा... ( पुडी उघडून धरतो )

बाबा : ( खुशीने ) मंजूकडचा ? ( तो मानेने ' हो ' म्हणतो... ) मंजूच्या गाडीसमोर तशीच गर्दी असते ?

विशा : अगदी तशीच...

बाबा : ( वडा खातात – ) आत जा.... आणि.... आणि माझ्या ट्रंकेवर कागदाचं एक

पुडकं आहे, ते जरा आण... (तो आत जातो)

[ बाबा दोन वडे बाजूला ठेवतात. तेवढ्यात विशा कागदांचे पुडके घेऊन येतो. ]

विशा : हे वडे का ठेवलेत ?

बाबा : राघव आणि इरावती खातील ! (एका वड्याची पुडी विशाकडे देत) हा माझ्या कोटाच्या खिशात ठेव...

विशा : कुणाला ?

बाबा : तुझ्या आईला आवडायचा... उद्या कावळ्यांना घालीन... (विशा पुडी कोटाच्या खिशात ठेवतो आणि जवळ येतो. तोपर्यन्त बाबा पुडके चाळतात. एक छोटे पुस्तक काढून दाखवतात) हे काय आहे ?

विशा : (बघून) विनोबांची गीताई...

बाबा : (दुसरी चोपडी दाखवीत) हे काय आहे ?

विशा : (बघून) हे माझं मराठी पहिलीचं प्रगतिपुस्तक आहे ! इतकी वर्षे ठेवलंत ?

बाबा : शेवटी काय लिहिलंय्, ते वाच....

विशा : (वाचतो) विश्वनाथ हा अभ्यासात हुशार आहे. तो स्वभावाने प्रेमळ आहे. चुटचुट बोलतो. त्याचे वडिलांवर अधिक प्रेम आहे. वर्गात दुसऱ्या मुलाशी भांडण झाले, तर 'बाबांना सांगेन ...' असे तो दटावतो...

[ पुढे न वाचता प्रगतिपुस्तकच बघत राहतो. बाबा कुठल्या तरी जुन्या काळात विरघळून जातात. दुसऱ्या कुणाशी तरी बोलल्यासारखे बोलत राहतात.]

बाबा : त्या तीस–चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणी जाग्या झाल्या, की अक्षरश: विरघळून जातो. तुला, शरदला मी शाळेत पोचवून मग दुकानात जात होतो... तुमची दोघांची दप्तरं मी माझ्या दोन खांद्यांवर घ्यायचो... तुम्हांला ओझं व्हायला नको, म्हणून... आठवतं ? (तो वेगळ्या नजरेने बाबांकडे बघत राहतो). दुपारी एक वाजता तुमची आई खाऊचे दोन डबे घेऊन शाळेत जायची... पुनः पुनः वाटतं, विशा, ते दिवस यावेत... घड्याळाचे काटे उलटे फिरावेत...(दुसरं पुस्तक देतात....) वाच...

विशा : (वाचतो) शरद हा हुशार मुलगा आहे. पण स्वभावाने घुम्या आणि अबोल आहे... त्याला संगीताची आवड आहे...

बाबा : त्याला मी बाज्याची पेटी घेऊन दिली होती... तो अजून वाजवतो का, रे ?

विशा : छे ! त्यानं ती कधीच विकून टाकली. (ते चमत्कारिक हसतात)

बाबा : विशा, तू जेवलास ? ( बसल्या बसल्या त्याचे डोळे कुरवळतात )

विशा : नाही, जाऊन जेवणार....

बाबा : नाहीतर इथं जेव... इरावतीनं रावसाची आमटी आणलीय्... फार फार चांगली माणसं आहेत...असा मुलगा... अशी सून असणं....( विशा एकदम हरवल्यासारखा बघत राहतो ) तुला आठवतं... तुझी आई... तिला तिसऱ्यांदा दिवस गेले, तेव्हा ती तुला घेऊन र. धों. कर्व्यांकडे गेली होती... भटवाडीत... मला न सांगता....

विशा : मी बारा वर्षांचा होतो....

[ तेवढ्यात दरवाजा उघडून इरावती घाईघाईने येते. तिच्या हातात ब्रेड आहे किंवा पिशवी. ]

इरावती : मला जरा उशीर झाला ना ? .... बाबुराव दोन दिवस आले नाहीत, म्हणून बघायला गेले—

बाबा : ते का नाही आले ?

इरावती : त्यांचे गुडघे दुखत होते...उद्या येणार... ( हसत ) बाबा, ते म्हणाले, उद्या-पासून त्यांना परत ऐकू येणार नाहीए... ( बाबा हसतात )

विशा : मी निघतो——

इरावती : माझ्यामुळं तुम्हांला थांबावं लागलं का ?

विशा : नाही ! तेवढ्याच थोड्या गप्पा झाल्या... (ती आत जाते) बाबा, मी निघतो—

बाबा : ( उठतात ) विशा... ( त्याच्या खांद्यावर हात टाकतात... ) अरे, मी आता चमत्कारिक टप्प्यावर आहे . रोज रात्री झोपतो.... डोळे मिटताना वाटतं, उद्या डोळे उघडणार नाहीत... पहाट होते, तेव्हा डोळे उघडतो. क्षणभर वाटतं, मी स्वर्गात आहे.... पण दुधाच्या बाटल्यांचा आवाज ऐकू येतो... आणि लक्षात येतं... मी इथंच आहे... कधीतरी मी डोळे मिटेन... काय-मचे ! वाटतं, ते लवकर मिटावेत.... तुझी आई गेल्यानंतर आता जगण्याची इच्छा राहिलेली नाही... पण मरण्याची इच्छा आहे, म्हणून मरता येत नाही ! ( त्याला जवळ घेतात आणि त्याच्या कपाळाचे चुंबन घेतात. ) विशा, कधी तरी शरदला घेऊन जा, म्हणावं... बाजूला घेऊन... रंग्या कसा आहे ? ( तो मानेने 'बरा आहे' म्हणतो, त्याला बोलता येत नाही. ) विशा, मी काही रामायणातला राम नाही. सामान्य माणूस मी ! तरीही माझं म्हणून एक रामायण आहेच.... ते रामायण माझ्या लव–कुशांनी गावं, एवढंच वाटतं....

एवढंच ! परमेश्वर तुम्हांला सुखी ठेवो—

[ विशा त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करतो आणि निघून जातो. बाबा आरामखुर्चीत बसतात. इरावती येते. ]

इरावती : गेले का ? ( बाबा मानेने ' हो ' म्हणतात ) बाबा, तुम्ही आत जाऊन झोपत का नाही ?

बाबा : झोपतो ! हे बघ.... तुझ्या आईच्या ट्रंकेवर एक बोचकं आहे, ते घेऊन ये. जा ( ती बोचके घेऊन येते, बाबा वडे देत ) हे वडे खा ! एक राघवला ठेवा ( ती घेते ). विशानं आणले होते. ( बाबा बोचके सोडेपर्यन्त ती वडे आत ठेवून येते. बोचक्यात काही लुगडी आहेत. वर एक सोन्याची माळ आणि मंगळसूत्र तिला देतात.... ) हे तुला घे.

इरावती : तुम्ही हे लीला आणि मीनाला द्या—

बाबा : ( लटक्या रागाने ) शहाणपणा करू नकोस ! तुझ्या आईनं मला सांगून ठेवलं होतं.. तुला द्यायला....

इरावती : पण, बाबा, आम्ही काही घेतलं, असं होईल...

बाबा : ( तिचा हात धरून...किंचित हसत.... ) तुझा पुनर्जन्मावर विश्वास आहे ?

इरावती : आहे !

बाबा : मला सारखं वाटतंय्....माझा पुनर्जन्म तुझ्या पोटी आहे. त्या वेळी हवी तर एक साखळी करून तुझ्या मुलाच्या गळ्यात घाल...तुमची म्हातारपणी सेवा करण्यासाठी पुनर्जन्म ! ( ती एकदम भावविवश होते आणि प्रेमाने त्यांच्या मांडीवर डोके टेकते. ते तिच्या केसांवरून मायेने हात फिरवतात. ) तुला माहीत नाही...रुक्मिणीला तिसऱ्या वेळी दिवस गेले, तेव्हा माझ्या नकळत ती र. धों. कर्व्यांकडे गेली...गर्भपात करून घेतला...इथं आल्यावर रुक्मिणी एकसारखी मला सांगायची, त्या वेळी आमच्या पोटी येणार होता, तो हा राघव...

इरावती : ( एकदम थरारते... ) बाबा, माझ्या अंगावरून हात फिरवा. माझं सगळं अंग अगदी मोहरून गेलंय्— मी तत्त्वज्ञानाची विद्यार्थिनी असूनसुद्धा !

[ ते मंगळसूत्र आणि माळ तिच्या गळ्यात घालतात. ती आपले गाल त्यांच्या मांडीवर घासते.
ते क्षणभर व्याकूळ झाल्यासारखे दिसतात. ते आपल्या छातीवरून हात फिरवतात. ती बघते... ]

इरावती : बाबा, काही त्रास होतोय् का ?

बाबा : नाही !...या क्षणी मला मरण आलं, तर ते बरंच ! मला काही वाटणार नाही. तुझी आई खूप भ्याली होती...तिनं माझा हात घट्ट दाबून धरला होता...दुसऱ्या मुठीत बाळकृष्ण धरला होता....तो शेवटपर्यंत सोबत करील, म्हणून... मृत्यूच्या अनोळखी प्रदेशात ! (क्षणभर थांबतात...) मला भीती नाही वाटत....ना भीती, ना दुःख ! विनोबांनी ' गीताई ' त म्हटलंय्... ' जन्मता निश्चये मृत्यू मरता जन्म निश्चये ! म्हणून न टळे त्याचा व्यर्थ शोक करू नको ! ' (बोचके दाखवीत) या रुक्मिणीच्या साड्या...तुला घे ! (त्यांतल्या दोन साडया देतात.) ही माझ्या आईची....ही तुझ्या आईची... (मागे उशीला लावतात आणि डोके टेकतात.) राघव अजून आला नाही ?

इरावती : येईल एवढ्यात...

बाबा : (शरदिनीचं पुस्तक डोळयांजवळ धरून चाळीत...) ही....ही कविता वाच. शरदिनीची ही कविता मला फार आवडते. (पुस्तक तिच्याकडे देतात. ती पुस्तकात बघते. त्यावेळी घडयाळाचा ठणदिशी एक टोला पडल्याचा त्यांना भास होतो. आनंदाने, पण कष्टाने मान उचलून घड्याळाकडे बघण्याचा प्रयत्न करीत...बोट वर करून—) ते चालू झालं, वाटतं ! (डोके टेकता... डोळे मिटतात...) वाच—

इरावती : (तिचे लक्ष पुस्तकातच आहे. ती तालावर—चालीवर नव्हे—वाचू लागते— )

किती दिवसांनी मनी नसताना
भेटलास तू आज अचानक
पाहिलेस तू माझ्या नयनी
नव्हती जणु अपुली ओळख
देशोदेशी फिरले किती तरी
किती भेटले लबाड भोळे
त्या सर्वांमधि सदैव मजला
दिसतचि होते तुझेच डोळे

[ ऐकता ऐकता बाबांना गाढ झोप लागते. प्रकाश आणखी मंद होतो इतक्यात दरवाज्यावरची बेल वाजते. इरावती दार उघडते. दारातून राघव येतो. तो खूप उत्साहात आहे. ]

राघव : इरा, बाबा झोपले ?

इरावती : नुकताच डोळा लागलाय् त्यांचा...

राघव : उठव–उठव त्यांना...

इरावती : का ?

राघव : अग, साळुंकेंनी लॉटरीचा रिझल्ट आणला होता... बाबांच्या तिकिटांचे नंबर मी लिहून ठेवले होते... बाबांना पाच लाखांचं बक्षीस लागलंय्.

इरावती : ( आनंदाने ) खरंच ? आपल्या खोलीत जाण्यासाठी ते थोड्या वेळानं उठतील, तेव्हा सांगू—

राघव : उठव तू ! दार्जींच्या नावानं पाडलोसची शाळा उभी राहणार, हे कळताच बाबांना आनंद होईल ! आणखी दहा वर्षं ते जगतील ! ( तो त्यांना हाक मारीत हालवतो ) बाबा...बाबा....

इरावती : ( पाय हलवीत ) बाबा...बाबा...

राघव : ( आकान्त करीत ) ओ... माय् गॉड ! व्हॉट अ पिटी !

इरावती : आणखी एक वर्ष जगले असते, तर पाडलोसची शाळा दृष्टीला पडली असती....

राघव : बाबा, तुमच्या वर्षश्राद्धाच्या दिवशी त्या शाळेचं उद्घाटन होईल– शाळा दार्जींच्या आणि तुमच्या नावानं....

[ दोघेही बाबांच्या मांडीवर डोकी टेकतात आणि काळोख होतो. पडदा पडता-पडता बाबांच्या धीरगंभीर आवाजात श्लोक ऐकू येतो :

जन्मता निश्चयें मृत्यू मरता जन्म निश्चयें ।
म्हणूनि न टळे त्याचा व्यर्थ शोक करू नको ।।...

**प ड दा**

म. ग्रं. ...
क्र. 22592 दि. ...
वि. ...

IRBK-0122712